७० वर्ष

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १५ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## स्वारगेटमध्ये अवैध रिक्षांवर कारवाई; ३७५ केसेसची नोंद

पुणे (दै. संध्या) : पुणे शहर वाहतूक शाखेने स्वारगेट परिसरात अवैध प्रवासी रिक्षांविरुद्ध विशेष मोहीम राबवली. वाहतूक शिस्त राखण्यासाठी आणि प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी ही कारवाई करण्यात आली असून, यामध्ये एकूण ३७५ केसेस नोंदवण्यात आल्या आहेत. जादा प्रवासी घेणे, भाडे नाकारणे, युनिफॉर्म न घालणे आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणे अशा विविध नियमभंगांवर कारवाई करण्यात आली, अशी माहिती वाहतूक पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी दिली. ही मोहीम स्वारगेट वाहतूक विभागामार्फत स्वारगेट जेधे चौक, स्वारगेट बसस्थानकाचे इनगेट-आउटगेट तसेच स्वारगेट महामेट्रो समोर या प्रमुख ठिकाणी राबवण्यात आली. १० मार्च २०२६ रोजी झालेल्या पहिल्या कारवाईत एकूण १४६ रिक्षांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये जादा प्रवासी घेणाऱ्या १११ रिक्षाचालकांवर आणि भाडे नाकारणाऱ्या ३२ चालकांवर कारवाई झाली. तसेच, नियमभंग करणाऱ्या तीन फॉल्टी रिक्षा जप्त करण्यात आल्या.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## परराज्यातील 'टक टक' टोळीचा पर्दाफाश

पुणे (दै. संध्या) : पुणे शहरात सिग्नल आणि गर्दीच्या ठिकाणी चारचाकी वाहनांना धडक लागल्याचा बहाणा करून वाहनचालकांचे मोबाईल आणि इतर मौल्यवान वस्तू जबरदस्तीने चोरणाऱ्या परराज्यातील "टक टक" टोळीचा पुणे गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दोघा आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून पुण्यातील अनेक गुन्ह्यांची उकल झाली आहे. फरासखाना पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या एका गुन्ह्याचा तपास सुरू असताना, गुन्हे शाखा युनिट १ मधील पोलीस अंमलदार मयूर भोसले, अमित जमदाडे आणि हेमंत पेरणे हे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत होते. तपासादरम्यान, दोन संशयित व्यक्तींचा शोध सुरू असताना, गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की हे संशयित समर्थ पोलीस स्टेशन हद्दीतील एका लॉजमध्ये येणार आहेत. ही माहिती मिळताच, पोलीस निरीक्षक अजित जाधव यांना कळवण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्वतः पथकासह लॉज परिसरात सापळा रचला. काही वेळात, मिळालेल्या वर्णनाशी मिळतेजुळते दोन इसम त्या ठिकाणी आले असता, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान, त्यांनी आपली नावे रवी ओमप्रकाश कोहली (वय ३८, रा. मेरठ, उत्तर प्रदेश) आणि अफजल कय्युम अब्बासी (वय ३८, रा. मेरठ, उत्तर प्रदेश) अशी असल्याचे सांगितले.

## आमिष दाखवून विद्यार्थ्यांची लूट

पुणे (दै. संध्या) : दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षांचे पेपर मिळवून देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या एका तरुणाला शिवाजीनगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या तरुणाने टेलिग्रामवर ग्रुप तयार करून क्यूआर कोडद्वारे पैसे उकळल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. टेलिग्राम कंपनीशी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करून संशयिताचा शोध घेण्यात आला. तपासातून आरोपीच्या बँक खात्याशी संबंधित तपशील मिळाल्यानंतर पोलिसांचे एक पथक तात्काळ चंद्रपूर येथे रवाना झाले. तपासात चैतन्य विनोद शेंडे (१८, रा. जातपुरा, चंद्रपूर) याने टेलिग्रामवर "महाराष्ट्र स्टेट बोर्ड २०२६ पेपर्स" नावाचा ग्रुप तयार केल्याचे उघड झाले.

## भाविकांना दुर्मिळ संधी

पुणे (दै. संध्या) : श्री स्वामी समर्थ महाराजांशी संबंधित पवित्र सूर्यमणी आणि त्यांच्या पादुकांचे दर्शन पुणेकरांना घेण्याची दुर्मिळ संधी मिळणार आहे. इतिहासात प्रथमच हा दिव्य ठेवा अक्कलकोट येथील राजवाड्याबाहेर आणून पुण्यात भाविकांसाठी ठेवण्यात येणार असल्याची माहिती मालोजीराजे भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्री अक्कलकोट राजघराणे चॅरिटी ट्रस्ट, सोलापूर यांच्या वतीने हा 'श्री स्वामी समर्थ सूर्यमणी व पादुका दर्शन सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा १७ व १८ मार्च रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० आणि १९ मार्च रोजी सकाळी ८ ते रात्री १० या वेळेत सिद्धी साज बँक्वेट येथे पार पडेल.

# जगात संघर्ष थांबवण्याची क्षमता मोदींमध्ये : मुख्यमंत्री

नागपूर (दै. संध्या)





भारताचे शिप हामुर्झमधून येत आहे, याचा आनंद आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता या गोष्टींवर केंद्र सरकार अधिकृतरित्या मत व्यक्त करेल. मात्र, जे मोदींच्या क्षमतेवर शंका व्यक्त करत होते, त्यांना मोदींनी आपल्या कृतीतून उत्तर दिले आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी इराणच्या भूमिकेचं स्वागत केलं. तसेच, अमेरिकेतील नेतेही सांगत आहेत की, आज जगात संघर्ष थांबवण्याची क्षमता मोदींमध्ये आहे. त्यामुळे, आपल्या देशातील बडबड आणि फडफड करणाऱ्या नेत्यांनी ही स्थिती समजून घेतली पाहिजे आणि गप्प राहिले पाहिजे, असेही फडणवीसांनी म्हटले.

जागतिक व्यापाराची जीवनवाहिनी मानली जाणारी 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' सध्या जगातील सर्वात धोकादायक ठिकाण बनली आहे. या सागरी मार्गावर इराणने आपले नियंत्रण घट्ट केले असून, अमेरिकेच्या वाढत्या लष्करी हालचालींमुळे येथे कधीही मोठा भडका उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणने अधिकृतपणे हा मार्ग पूर्णपणे बंद केला नसला तरी, त्यांनी एक 'नवी चाल' खेळली आहे. इराण केवळ त्यांच्या अटी मान्य करणाऱ्या आणि मित्रराष्ट्रांच्या जहाजांनाच या मार्गातून जाण्याची परवानगी देत आहे. भारताने आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर मोठा विजय मिळवल्याचे बोलले जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने इराणसोबत केलेल्या यशस्वी चर्चेनंतर, भारतीय ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजांना 'सुरक्षित मार्ग' देण्यात आल्याचा दावा केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केलंय. अमेरिकेतील नेतेही सांगत आहेत की, आज जगात संघर्ष थांबवण्याची क्षमता मोदींमध्ये आहे. त्यामुळे, आपल्या देशातील बडबड आणि फडफड करणाऱ्या नेत्यांनी ही स्थिती समजून घेतली पाहिजे आणि गप्प राहिले पाहिजे, असेही फडणवीसांनी म्हटले.

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतातील इंधन पुरवठा आणि गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम झाल्याचं पाहायला मिळत आहे. गॅस वितरणाच्या त्रुटीमुळे गॅस एजन्सीबाहेर नागरिकांची गर्दी झाल्याचं दिसून येतं. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी काँग्रेसलाही लक्ष्य केलं. गॅस एजन्सीबाहेर नागरिकांची गर्दी होत नाही. तर काँग्रेसच्या नेत्यांनी लोकांमध्ये जो पॅनिक तयार केला आहे, त्यामुळे ही गर्दी होत आहे. मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये पॅनिक निर्माण करण्याचे षडयंत्र काँग्रेसने केलंय, असा आरोप फडणवीस यांनी केलाय.

### गॅस एजन्सीबाहेरील रांगा काँग्रेसचं षडयंत्र

वारंवार देशाच्या सरकारने सांगितले आहे की, घरगुती गॅस, पेट्रोल, डिझेल याचा तुटवडा आपल्याकडे नाही. रेशनिंगही करण्यात आलेलं नाही. मात्र, तरीही काँग्रेसकडून लोकांना भडकवले जात आहे, रांगा लावायला लावल्या जात आहेत, हे षडयंत्र आहे, असे फडणवीसांनी म्हटले. त्यावर, काँग्रेसचे षडयंत्र असल्याचा तुमचा आरोप आहे, याचे काही पुरावे आहे का? असा प्रश्न मुख्यमंत्र्यांना विचारण्यात आला होता. त्यावर, पुरावे काय द्यायचे? स्वतः राहुल गांधी सांगत आहेत, नाना पटोलेही तेच करत आहे, वडेट्टीवारही तेच करत आहेत आणखी किती पुरावे पाहिजे? असा प्रतिसवालच फडणवीसांनी केला.

## साईबाबा संस्थानाकडून भाविकांना आता फक्त एकच लाडू प्रसाद

अहिल्यानगर (दै. संध्या)



इराण आणि इस्रायलमधील वाढत्या तणावामुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे चित्र देशभर दिसत आहे. या परिस्थितीचा परिणाम आता महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांवरही जाणवू लागला आहे. शिर्डीतील प्रसिद्ध साईबाबा संस्थानलाही गॅस टंचाईचा फटका बसला असून प्रसाद वितरणात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रोज लाखो भाविक दर्शनासाठी शिर्डीत येत असल्याने प्रसादासाठी मोठ्या प्रमाणात लाडू तयार केले जातात. मात्र गॅस साठा मर्यादित असल्यामुळे संस्थानने आता प्रत्येक भाविकाला फक्त एकच लाडू प्रसादाचे पाकीट देण्याचा निर्णय घेतला आहे. साई संस्थानच्या माहितीनुसार, दररोज सुमारे पंचेचाळीस हजार लाडू पाकीटांची विक्री केली जाते. याशिवाय दर्शनासाठी उभ्या असलेल्या भक्तांना दररोज जवळपास पन्नास हजार बुंदी प्रसाद पाकीटांचे मोफत वितरण केले जाते. लाडू तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गॅसची आवश्यकता असते. सध्या गॅस टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रसाद तयार करताना इंधन बचत करणे आवश्यक झाले आहे.

# मुलीची लग्नपत्रिका वाटून परतताना काळाचा घाला

### *गिट्टीने भरलेला ट्रक उलटल्याने इंदोरा येथील दोन व्यक्तींचा जागीच मृत्यू*

भंडारा (दै. संध्या)



नियतीचा खेळ किती क्रूर असतो याचा प्रत्यय लाखांदूर तालुक्यातील इंदोरा येथे आला आहे. ज्या घरात काही दिवसांवर मुलीचे लग्न येऊन ठेपले होते, त्याच घराचा आधारस्तंभ काळाने हिरावून नेला. आपल्या लाडक्या मुलीच्या लग्नाची पत्रिका वाटून मित्रासोबत घरी परतणाऱ्या पित्याचा भीषण रस्ते अपघातात जागीच मृत्यू झाला. अर्जुनी मोरगाव जवळील अरूण नगर परिसरात गिट्टीने भरलेला १२ चक्का ट्रक दुचाकीवर उलटल्याने झालेल्या या भीषण अपघातात दोन जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदोरा येथील प्रतिष्ठित नागरिक रमेश सावस्कार (वय ४८) यांच्या मुलीचे लग्न २ एप्रिल रोजी नियोजित आहे. सध्या सर्वत्र लग्नाची लगबग सुरू असून, रमेश सावस्कार हे आपले मित्र अशोक काळबांदे (वय ५२) यांच्यासोबत सासुरवाडी खामखुरा येथे निमंत्रण पत्रिका वाटण्यासाठी गेले होते. १३ मार्च रोजी रात्री ८:३० वाजताच्या सुमारास, पत्रिका वाटप आणि जेवण आटोपून दोघेही दुचाकीने आपल्या गावाकडे परतत होते. दरम्यान अर्जुनी मोरगाव जवळील अरूण नगर परिसरातून जात असताना, समोरून गिट्टीने भरलेला एक १२ चाकी ट्रक भरधाव वेगात येत होता.


दरम्यान, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अवजड ट्रक थेट सावस्कार यांच्या दुचाकीवर पलटी झाला. हा अपघात इतका भीषण होता की, ट्रकखाली दबल्या गेल्यामुळे रमेश सावस्कार आणि अशोक काळबांदे या दोघांचाही जागीच चेंदामेंदा होऊन मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता एवढी मोठी होती की मृतदेहांची ओळख पटवणेही कठीण झाले होते, मात्र अशोक काळबांदे यांच्या खिशातील पाकीटावरून त्यांची ओळख पटली.

मृतक रमेश सावस्कार हे इंदोरा येथील 'कमलाबाई कृषी केंद्रा'चे मालक होते, तर अशोक काळबांदे हे 'अशोक फोटो स्टुडिओ' चे मालक होते. व्यवसायानिमित्त या दोन्ही व्यक्तींचा परिसरात मोठा जनसंपर्क होता. ज्या घरात सनई-चौघडे वाजणार होते, तिथे आता शोककळा पसरली असून सावस्कार आणि काळबांदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे संपूर्ण लाखांदूर तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत सर्वाधिक सिलेंडर मार्च महिन्यात उपलब्ध

मुंबई (दै. संध्या)

■ पुरवठा मंत्री छगन भुजबळांनी दिली माहिती



आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गॅस (Gas) आणि इंधन पुरवठ्याबाबत अनेक संभ्रम आणि अफवा राज्यात पसरल्या आहेत. राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नसून, नागरिकांनी इंधन किंवा गॅस तुटवड्याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाच्या वतीने आपण जनतेला असं आवाहन करत असल्याचंही त्यांनी सांगितलं. राज्यात घरगुती एलपीजीची दैनंदिन मागणी 9,000 मेट्रिक टन असताना, उत्पादन वाढवून ते 11,000 मेट्रिक टनांपर्यंत नेले आहे. मार्च महिन्यात गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात सिलेंडर उपलब्ध आहेत. पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असून रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे, घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याबाबत नागरिकांनी निश्चिंत राहावे, अशी माहितीही छगन भुजबळ यांनी फेसबुक पोस्टवरुन दिलीय. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष समित्या स्थापन केल्या आहेत. रुग्णालये, शाळा, आश्रमशाळा आणि अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने मिळेल, याची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा तक्रारींसाठी तालुका व जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष आणि व्हॉट्सअ‍ॅप सुविधा तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पुरवठा विभाग परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठा सुरळीत राहण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सरकारकडून गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांत ग्राहकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. बुकिंग करूनही गॅस उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना गॅस एजन्सीसमोर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये पहाटेपासूनच गॅस एजन्सी कार्यालयांबाहेर ग्राहकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

## शैक्षणिक संस्थांना १००%, इतरांना ७० ते ५०% गॅस पुरवण्याचे आदेश

मुंबई (दै. संध्या)



इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे राज्यात स्वयंपाकाच्या गॅसचा भयंकर तुटवडा निर्माण झाला आहे. बुकिंग करूनही गॅस मिळत नसल्यामुळे नागरिकांच्या गॅस एजन्सीपुढे लांबलचक रांगा लागल्या आहेत. यामुळे सरकारने एका परिपत्रकाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम क्षेत्र व त्यांना गरजेनुसार किती गॅस पुरवठा करायचा? यासंबंधीचे दिशानिर्देश जारी केलेत. यात काही क्षेत्रांना 100 टक्के, तर काही क्षेत्रांना 70 ते 50 टक्के गॅस पुरवठा करण्याची सूचना करण्यात आली आहे. सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत राज्य सरकारने स्वयंपाकाच्या गॅसच्या पुरवठ्याला प्राधान्य दिले आहे. या प्रकरणी व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर अंशतः निर्बंध लादण्यात आलेत. परिणामी, गॅसवर अवलंबून असणाऱ्या राज्यातील उद्योग, व्यवसायांना जबर फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एका परिपत्रकाद्वारे गॅस वितरणाविषयी एक नियमावली जारी केली आहे. त्यानुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक सेवांना 100 टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेत. तर इतर संस्था व विभागांना 70 ते 50 टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश सरकारने दिलेत.

# कागलमध्ये ₹३५७.९९ कोटींचा सर्व्हिस रोडसह ६ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर मंजूर

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची घोषणा; सीएम फडणवीस म्हणाले, कोल्हापूरच्या विकासाला नवे पंख

मुंबई (दै. संध्या)



केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मोठी घोषणा केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-48 वर 6-लेन एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या (उन्नत मार्ग) बांधकामाला मंजुरी देण्यात आली असून, यासाठी 357.99 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, नितीन गडकरी यांनी एलिव्हेटेड कॉरिडॉरला मंजुरी दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीएम मोदी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. कागल शहराच्या हद्दीत महामार्गाच्या दोन्ही बाजूंना 3-लेन कॉंक्रीट सर्व्हिस रस्त्यासह हा 6-लेन एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारला जाणार आहे. यामुळे महामार्गावरून जाणारी लांब अंतराची अवजड वाहतूक वरून (एलिव्हेटेड मार्गावरून) जाईल, तर स्थानिक वाहतूक खालच्या सर्व्हिस रोडवरून सुरळीतपणे सुरू राहील. NH-48 हा दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळुरू आणि चेन्नई यांसारख्या महानगरांना जोडणारा 'गोल्डन क्वाड्रिलॅटरल'चा मुख्य भाग आहे. कागलमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवाशांचा वेळ आणि इंधन वाया जात होते, त्यातून सुटका होईल.

नितीन गडकरी यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहरात राष्ट्रीय महामार्ग-48 वर दोन्ही बाजूस 3-लेन कॉंक्रीट सर्व्हिस रस्त्यासह 6-लेन एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या बांधकामासाठी 357.99 कोटी रुपयांच्या तरतुदीसह मंजुरी देण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग-48 हा भारताच्या गोल्डन क्वाड्रिलॅटरल (GQ) महामार्ग नेटवर्कमधील अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून तो दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळुरू, चेन्नई या प्रमुख शहरांना जोडतो. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे 5-स्टार एमआयडीसी (MIDC) औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे या भागात व्यापार व उद्योग झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे या महामार्गावर मोठ्या प्रमाणात मालवाहतूक होत असून प्रचंड वाहतूक कोंडी व प्रदूषणातही वाढ होत आहे. याचा परिणाम आपातकालीन सेवांवर देखील होत आहे. उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे लांब अंतराची जलद वाहतूक वेगळी होणार असून स्थानिक वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. यामुळे प्रवासी व मालवाहतुकीसाठी गतीमान व सुरक्षित प्रवास शक्य होईल.

तसेच इंधन बचत होऊन प्रवासाचा वेळही कमी होईल. परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. या उन्नत महामार्गामुळे या भागातील उत्पादकता वाढेल, आर्थिक सुबत्ता वाढेल व आपातकालीन सेवा कार्यक्षमतेने पुरवता येतील. यामुळे देशांतर्गत वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल आणि मालवाहतुकीची कार्यक्षमता वाढेल.

## संपादकीय

# युद्धाची निरर्थकता दाखवणारं, २० वर्षं जगभर फिरलेलं चित्र...

एक काळं-पांढरं, आयताकृती, असंख्य गुंतागुंतीच्या आकृत्या असलेलं चित्र. युद्धाचं प्रातिनिधिक चित्रण म्हणून त्याला अमाप लोकप्रियता लाभली. स्पेनच्या बास्के प्रांतावर जर्मनीने बॉम्बहल्ला केला, त्यानंतर १९३७ साली स्पॅनिश चित्रकार पिकासोने ते काढलं. बॉम्बहल्ला झाला त्यावेळी पिकासो पॅरिसमध्ये रहात होता. स्पॅनिश सरकारने एका जागतिक प्रदर्शनाकरिता म्युरल काढण्याचं काम त्याला दिलं होतं. स्पेनमध्ये सरकारविरुद्ध लष्करी क्रांती पुकारली गेली होती. पिकासोला कलेचा राजकारणाशी संबंध यायला नको होता, पण पैशांकरिता त्याने हे काम स्वीकारलं; नाखुषीमुळे रेंगाळत ठेवलं. मात्र काही महिन्यांनी जर्मनीने सतत तीन तास केलेल्या संहारक बॉम्बहल्ल्यात गेर्निका शहर संपूर्ण उद्‌ध्वस्त झालं. असंख्य नागरिक मारले गेले, जखमी झाले. हा विध्वंस पाहून व्यथित मनाने पिकासोने म्युरल रंगवायला घेतलं.

११.५ × २५.५ फूट आकाराचं, क्युबिस्ट, गुंतागुंतीची रचना असलेलं हे चित्र पिकासोने फक्त तीन आठवड्यात रंगवलं. इतका प्रचंड विध्वंस चितारायला अशाच आकाराची गरज होती. चित्र जागतिक प्रदर्शनाच्या प्रवेशद्वारावर लावलं गेलं. येणाऱ्याची पहिली नजर त्यावर पडत होती. चित्रातल्या आकृत्या मनावर ताण आणणाऱ्या. वेदनेने खिंकाळणारा घोडा चित्राच्या मधोमध, डाव्या बाजूला एक वेडापिसा उन्मत्त बैल. एका लहान मुलीला आईने कसंबसं उचलून धरलं आहे.

उजवीकडे दिवा धरलेली एक भुतासारखी बीभत्स आकृती, बाजूला हात वर करून उभी असलेली हताश, असहाय स्त्री. बाकी सर्वत्र ज्वाळा, विव्हळणारे चेहरे, तुटके अवयव, मानवी क्रौर्य, विध्वंसाच्या खुणा कॅनव्हासभर विखरून. एकेरी काळ्या-पांढऱ्या रंगसंगतीमुळे चित्रामधलं औदासिन्य जास्त अंगावर येतं. युद्धामुळे



होणारी निरर्थक हिंसा, आयुष्याची दैना मनावर काजळी धरते. प्रदर्शन संपल्यावर चित्र स्पेनला परत करायला पिकासोने विरोध केला. तिथे लोकशाहीचं राज्य येईपर्यंत चित्र देशाबाहेरच राहील, असं निक्षून सांगितलं. त्यामुळे पुढची अनेक वर्षे चित्र अज्ञातवासात राहिलं. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फ्रान्सवर कब्जा केलेल्या नाझी सैन्याच्या भीतीने पिकासोने चित्र न्यूयॉर्कला पाठवलं. पुढची वीस वर्षे ते जगभर फिरत राहिलं. लोक झुंडीने पाहायला गर्दी करत. जागतिक महायुद्धाने झाकोळलेल्या मनांना चित्राचा अर्थ उलगडून सांगण्याची गरज उरली नाही. आपल्या हयातीत चित्र मायदेशी गेल्याचं पिकासो पाहू शकला नाही. त्याच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी अमेरिकेनं चित्र स्पेनमध्ये परत पाठवलं. चित्राच्या प्रतीकात्मकतेवर अजूनही चर्चा होत राहते. जगात जोवर युद्ध होत राहतील, त्यातले संदर्भ ताजे राहतील. काही चित्रांचं अमरत्व आणि लोकप्रियता नकोशी वाटते.

## संस्कृत सुभाषित

अमर्षजो हि संताप: पावकाद्दीप्तिमत्तर:

(वन पर्व, अध्याय ३५, ११, महाभारत)

अर्थ – असहिष्णुतेमुळे येणारा संताप अग्निपेक्षाही जास्त प्रखर असतो.

## गुरु वचन

### ज्येष्ठांच्या अनुभवाला कमी लेखू नका

एका शेठजीकडे अपार संपत्ती होती. एकेदिवशी त्याच्या मनात विचार आला की, एक भव्य शिव मंदिर बांधावे. सहा महिन्यात मंदिर बांधून तयार झाले. मंदिर उभारणीसाठी लागलेल्या खर्चाशिवाय जो पैसा शेठजीकडे उरला होता तो त्यांनी मंदिराच्या घुमटात भरून ठेवला.

याचा उल्लेख त्यांनी आपल्या वहीखात्यातही केला. नंतर ते तीर्थयात्रेला निघाले. मात्र वाटेतच त्यांचे निधन झाले. शेठजीचे चार मुले होती आणि चारही जण व्यापारी होते. शेठजीच्या मृत्युनंतर काही दिवसांनी त्यांच्या व्यापारात तोटा झाला. त्यामुळे त्यांना पैशाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा त्यांनी आपल्या वडिलांची जुनी वहीखाते शोधण्यास सुरूवात केली. त्यापैकी एकात मंदिराच्या घुमटात धन ठेवल्याचा उल्लेख होता.

त्यात असेही लिहिले होते की, धन चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी घुमटात भरले होते. चार जणांनी घुमट तोडले. मात्र त्यांना धन मिळाले नाही. तेव्हा त्यांना आपल्या वडिलांचे घनिष्ठ मित्र असलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तीला गाठले आणि घडलेला प्रकार सांगितला. त्या व्यक्तीने त्यांना चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी बारा वाजता येण्यास सांगितले. ठरलेल्या दिवशी व वेळी त्या व्यक्तीने त्या ठिकाणी खोदण्यास सुरूवात केली जिथे घुमटाची सावली पडली होती.

घुमटाची सावली चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता धन भरले होते आणि त्याच महिन्यात, दिवशी आणि वेळी घुमटाची सावली पडणाऱ्या ठिकाणी खोदकाम करण्यात आल्यावर धन सापडले. चौघा भावांनी ज्येष्ठ व्यक्तीचे आभार मानले आणि त्या धनातून आपला व्यापार पुन्हा सुरू केला. यावरून ज्येष्ठांच्या ठिकाणी असलेल्या अनुभवाला कमी लेखू नये, हेच ही कथा सांगते.

## उपदेशकथा

### निश्चय

पेशवाई काळातील गोष्ट. एका सावकाराकडे राम नावाचा एक मुलगा घरकामाला होता. तो वयाने जवळजवळ १२ वर्षांचा असेल पण निरक्षरच होता. एकदा तो सावकार बाहेरून परत आला. लगबगीने रामने तांब्याभर पाणी घेतले आणि तो मालकांच्या पायांवर घालू लागला. सहज त्याचे लक्ष मालकाच्या कानांकडे गेले. तो पाहातच राहिला. कानात सोन्याची भिकबाळी होती पण तिच्याकडे पाहत राहिल्याने तांब्यातील पाणी मालकाच्या पायांऐवजी भलतीकडेच पडू लागले. ते खेकसले, 'राम्या, लक्ष कुठे आहे तुझे?' राम दचकला. म्हणाला, 'धनी, मला तुमच्यासारखी सोन्याची भिकबाळी मिळेल का कधी?' ते ऐकून सावकार जोराने हसला. म्हणाला, 'राम्या, लेका भिकबाळी कोणालाही मिळत नसते. त्याला विद्वान, श्रीमंत असावं लागतं. तू दोन्हीही नाहीस. उगाच नाही ती स्वप्नं पाहू नकोस.' रामला ते बोलणे लागले. त्याचे स्वभिमानी मन दुखावले. त्याने मनाशी निश्चय केला. तो काशीला गेला. तिथे बारा वर्षे शिक्षण घेऊन विद्वान बनला. श्रीमंतही झाला. हा राम म्हणजे पेशव्यांचा सरन्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे.

कथा उपदेश : निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ।
कोणतेही काम जिद्दीने करा. यश तुमचेच आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:परिध १०:२४:५७ |
| १५ मार्च २०२६ | करण:बालव ०९:१६:४६ |
| रविवार | करण:कौलव २१:३४:१४ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मीन ०१:००:०१ |
| फाल्गुन शके | चन्द्र:मकर |
| संवत्– १९४७ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | मुस्लिम मास – रमजान |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – २५ |
| मास– फाल्गुन | विशेष |
| ऋतु– सौर वसंत | पापमोचनी एकादशी |
| कृष्ण पक्ष | श्रवणोपवास |
| तिथि:एकादशी | जागतिक ग्राहक दिन |
| ०९:१६:४६ | नामदेव संस्थान उत्सव – |
| नक्षत्र:श्रवण २९:५५:५५+ | नर्सीनामदेव (हिंगोली) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | 5 | | | | 7 | |
| 2 | | | | 6 | 9 | 1 | 8 | 3 |
| | | | | 7 | | | | 9 |
| 9 | 6 | 5 | | | 8 | 4 | | |
| | | 2 | | | | 9 | | |
| | | 4 | 6 | | | 7 | 5 | 2 |
| 5 | | | | 1 | | | | |
| 7 | 1 | 3 | 2 | 8 | | | | 5 |
| | 2 | | | | 6 | 3 | | |

: सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८८६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | 2 | 3 | 5 | 7 | 4 | 1 | 8 |
| 8 | 3 | 7 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 5 |
| 1 | 4 | 5 | 6 | 8 | 2 | 7 | 9 | 3 |
| 2 | 1 | 9 | 8 | 7 | 6 | 5 | 3 | 4 |
| 7 | 6 | 4 | 5 | 3 | 9 | 2 | 8 | 1 |
| 5 | 8 | 3 | 2 | 4 | 1 | 9 | 7 | 6 |
| 3 | 7 | 6 | 9 | 1 | 5 | 8 | 4 | 2 |
| 9 | 5 | 1 | 4 | 2 | 8 | 3 | 6 | 7 |
| 4 | 2 | 8 | 7 | 6 | 3 | 1 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८१५ – ब्रिजिट क्लीझरी या पंचवीस वर्षीय तरुणीस चेटकी समजून आयर्लंड मधील बाल्टीवॉर्डन या गावी जाळण्यात आले. ग्रेट ब्रिटनमधील अशा प्रकारची ही शेवटची घटना मानी जाते.
- १९०७ – फिनलंडच्या लोकप्रतिनिधी गृहावर स्त्री–प्रतिनिधीची निवड. अशा प्रकारे स्त्रियांना लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देणारे फिनलंड हे पहिले राष्ट्र बनले.

### राष्ट्रीय

- १८३१ – मराठीतील पहिली छापील पंचांग विक्रीस उपलब्ध झाले.
- १९१९ – हैद्राबाद येथे उस्मानिया विद्यापीठाची सुरुवात.
- १९७२ – भारतीय सैन्य बांगलादेशातून मायदेशी परतले.
- २००४ – हिंदी चित्रपट अभिनेता गोविंदाचा कॉंग्रेस प्रवेश.
- २००४ – मुद्रांक घोटाळ्याचा तपास सीबीआयकडे सोपविण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश.
- २००५ – कॉमन वेल्थ क्रीडा स्पर्धांमध्ये नेमबाजीत भारताला नऊ सुवर्णपदक मिळाली.

### जन्म

- ००७६ – रोमन योद्धा हॅडरियन यांचा जन्म.
- १८०९ – लिबिरियाचे पहिले राष्ट्रपती जोसेफ जेनकीन्स रॉबर्टस् यांचा जन्म.
- १८६६ – कृष्णाजी केशव दामले 'केशवसुत' यांचा जन्म.

### निधन

- १९३७ – मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध अभिनेते बापूराव पेंढारकर यांचे निधन.
- १९८३ – डेम रेबेका वेस्ट (सेसिल इजाबेल फेअरफील्ड) या स्त्रीवादी लेखिकेचे निधन.

## : SMS :

Sardar wanted to make a STD call to punjab, He wanted to save money so what did he do? Simple, he went to punjab and made a local call..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.९ | २३.६ |
| अहमदनगर | ३३.३ | २३.३ |
| अकोला | ३७.२ | २४.७ |
| अमरावती | ३६.३ | २४.७ |
| बीड | ३९.४ | २५.२ |
| भंडारा | ३७ | २२.५ |
| बुलढाणा | ३०.१ | १७.२ |
| चंद्रपूर | ३८.९ | २५.३ |
| चेन्नई | ३७ | २२.१ |
| नवी दिल्ली | २९.६ | १९.१ |
| धुळे | ३५.६ | २४.१ |
| गोंदिया | ३५.७ | २१.६ |
| जळगाव | ३७.२ | २४.१ |
| कोल्हापूर | ३४.६ | २१.४ |
| लातूर | ३४.५ | २२.७ |
| मुंबई | ३६ | २८.६ |
| नागपूर | ३६.४ | २२.७ |
| नांदेड | ३६.८ | २४.४ |
| नंदूरबार | ३४.२ | २४.६ |
| नाशिक | ३४.१ | २२.१ |
| पुणे | ३३.४ | २२.३ |
| पंढरपूर | ३६ | २४.५ |
| सातारा | ३५ | २०.९ |
| सांगली | ३५.७ | २२.१ |
| सोलापूर | ३५.७ | २६.२ |
| वर्धा | ३८.१ | २४.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** सामाजिक कार्यात यश मिळेल, कौतुक होईल. प्रगल्भ विचारसरणी यांतून आपल्या अडचणींवर सहजपणे मात कराल.

**तुळ :** अचानक अनावश्यक खर्च उद्भवतील. आपल्या आवडत्या छंदास व्यावसायिक स्वरुप देण्यास योग्य काळ आहे.

**वृषभ :** लेखक, शिक्षकांकडून चांगली कामगिरी होणार आहे. मन शांत राहिल्याने त्याचा व्यवसायावर चांगला परिणाम होईल.

**वृश्चिक :** सार्वजनिक कामात यश मिळेल. मिष्टान्न भोजनाचे योग येतील. गुंतवणूकीतून लाभ होतील. आपल्या इच्छा, अपेक्षा कृतीत आल्याने समाधान लाभेल.

**मिथुन :** जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना सुसंधी लाभतील.

**धनु :** अनावश्यक खर्च उद्भवतील. आपली बाजू प्रभावीपणे मांडल्यामुळेच आपल्या मतांचा आदर केला जाईल. सांस्कृतिक कार्यक्रमातून आनंद लुटाल.

**कर्क :** नावीण्यपूर्ण कलाकृतींचा ध्यास घ्याल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल.

**मकर :** नोकरीतही अनपेक्षित चांगला बदल झाल्याने समाधान लाभेल. अधिकारावर असणाऱ्या स्त्री व्यक्तीकडून आपले लांबलेले काम होईल.


**सिंह :** सतत शुभशकुनांचा सतत प्रत्यय येईल. गुरुची कृपा आपल्या प्रयत्नांना यश देईल. व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण करु शकाल.

**कुंभ :** आपल्या कर्तृत्वाला चांगली झळाळी मिळेल. तरुणांना नोकरीत सुसंधी लाभतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल.

**कन्या :** अपेक्षित गाठीभेटी झाल्याने मन प्रसन्न होईल. एखादा निर्णय अनपेक्षितपणे झटपट घेतला जाईल. आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील.

**मीन :** व्यवसायातील कामाचा वेग वाढेल. मिळालेल्या संधीचा लाभ आपले भविष्य उज्वल करणारा राहील. रचनात्मक कामातून लाभ होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८७



### आडवे शब्द

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी, २०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा, २५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

### उभे शब्द

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग, ३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ, ४६. वार्धक्य
४८. भेग, ४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.तांब्या ३.सालाबादप्रमाणे ७.पसायदान १०.बदनामी १२.कीर १४.वलय १६.वाफ १७.पटाव १९.विलाप २१.मोड २१अ.जबान २२.काकी २३.शत्रुघ्न २५.गज २६.उमाळा २७.वावटळ २८.अन्य २९.वडील ३१.राजी ३३.भेजा ३४.टग्या ३५.पत ३६.परवानगी ३८.तस्त ४०.वाटप ४२.सौर ४३.राख ४४.रंक ४५.केशव ४६.बटीक ४७.वग ४९.वाहवा ५२.बंडलबाज ५४.रघुवीर ५८.यार ६०.गादी ६१.थाबा ६३.वजन ६५.अंगद ६७.म्यान ६८.विनाशकाले ७१.ठाव ७३.काक ७४.कमनीय ७७.जमीन ७९.अनावर ८१.गरुड ८२.गोरा ८३.गगन ८५.तरुणपण ८६.केली ८८.सागर ८९.थक्क ९०.नाद ९१.नड

उभे उत्तर : १.तांबडा २.ब्याद ३.सामील ४.बाकी ५.दरवाजा ६.मान्य ८.साठा ९.दाखला ११.नावड १३.लाट १५.यजमान १७.पाकीटमार १८.वश १९.विघ्न २०.पर्जन्य २१.मोजडी २२.बाळा २२अ.काव २४.त्रुटी २५.गवगवा २७.वाजी २८.अजातशत्रू ३०.लटपटीत ३१.रात ३२.जनक ३५.परवड ३६.पखवाज ३७.वारंवार ३९.स्तव ४१.टब ४८.गलथान ५०.दैवी ५१.जयाअंगी ५२.बंदी ५३.बाबा ५५.घुटका ५६.रव ५७.मौन ५९.रग ६२.विनाकारण ६४.जननी ६६.दशमी ६७.म्याव ६९.शठ ७०.लेकरू ७२.कनात ७५.मडके ७६.यथा ७७.जरासा ७८.नगर ८०.वरुण ८१.गणना ८४.नथ ८७.लीन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# मंत्री मुरलीधर मोहोळ रुग्णालयात दाखल

## जुन्या दुखापतीने डोकं वर काढल्याने पायावर शस्त्रक्रिया



**पुणे (दै. संध्या) :**

केंद्रीय विमान व नागरी उड्डाण राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीभर मोहोळ यांना पायाच्या दुखापतीमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या पायावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या संदर्भातील माहिती त्यांनी स्वतः फेसबुक पोस्टद्वारे दिली. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी त्यांना किमान 1 महिना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, संसद अधिवेशन सुरू असतानाच ही शस्त्रक्रिया करावी लागल्याचेही त्यांनी नमूद केले. अधिवेशनातील कामकाज, देशभरातील दौरे, तसेच पुणे लोकसभा मतदारसंघातील नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवण्याची जबाबदारी या सगळ्यामुळे विश्रांती घेणे कठीण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. याशिवाय यंदाची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धाही जवळ येत असल्याने या काळात विश्रांती घ्यावी लागणे अधिकच अवघड वाटत असल्याचे त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले. मात्र दुखापतीचा त्रास वाढत असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शस्त्रक्रिया करणे अपरिहार्य ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मोहोळ यांनी आपल्या समर्थकांना आणि नागरिकांना उद्देशून लिहिले आहे की, दुखापतीच्या वेदनेपेक्षा सध्या सुरू असलेल्या कामांपासून दूर राहावे लागणे अधिक त्रासदायक वाटत आहे. तरीही नागरिकांच्या शुभेच्छा आणि आशीर्वादाच्या बळावर आपण लवकर बरे होऊ आणि सुमारे 1 महिन्यानंतर पुन्हा पूर्वीपेक्षा अधिक जोमाने कामाला सुरुवात करू, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली आहे.

मोहोळ यांनी आपल्या पोस्टमध्ये तब्बल 29 वर्षांपूर्वी घडलेल्या एका घटनेचा उल्लेख केला आहे. कोल्हापूर येथे कुस्ती खेळताना त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. त्या दुखापतीमुळे त्यांना कुस्ती कायमची सोडावी लागली. अनेक वर्षे हा त्रास सहन करत त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, मात्र अलीकडे दुखण्याची तीव्रता वाढू लागल्याने डॉक्टरांकडे तपासणी केली असता शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचा सल्ला देण्यात आला.



## मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरेच्या उपस्थितीत ऑडिशन संपन्न

**पुणे (दै. संध्या) :**

स्मृती एंटरप्राईझेसच्या वतीने आयोजित 'द ज्वेल वन पेजेंट – मिस अँड मिसेस महाराष्ट्र 2026' या राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स आज सॅफ्रॉन बॅन्क्वेट्स येथे उत्साहात पार पडल्या. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी सहभागी महिलांशी संवाद साधत त्यांना आत्मविश्वासाने आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या अध्यक्षा स्वातीताई पोकळे,स्मृती एंटरप्राईझेसच्या संचालिका स्मृती बोनगे, संचालक आधार शिंदे उपस्थित होते. आयोजकांनी स्पर्धेच्या संकल्पनेविषयी माहिती देत महिलांना व्यक्तिमत्त्व विकास, फॅशन, मॉडेलिंग आणि मनोरंजन क्षेत्रात पुढे जाण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगितले.

या स्पर्धेत 18 ते 55 वयोगटातील विवाहित आणि अविवाहित महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. पुणे ऑडिशन्समध्ये ८० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवत आपली कला आणि व्यक्तिमत्त्व सादर केले. निवड झालेल्या स्पर्धकांना पुढील फेरीसाठी पात्र ठरवण्यात आले.

महाराष्ट्रभरातील महिलांना आपली प्रतिभा, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व सादर करण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आल्याची भावना अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांनी व्यक्त केली आणि स्पर्धकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छ दिल्या.

स्पर्धेच्या अंतिम फेरीत विजेत्यांना एकूण 12 लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत. तसेच अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या 40 स्पर्धकांना स्मृती एंटरप्राईझेस आणि पेंटेन स्टुडियोज प्रस्तुत 'जयोस्तुते' या म्युझिक अल्बममध्ये काम करण्याची संधी दिली जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध सहा शहरांमध्ये पुढील ऑडिशन्स आयोजित करण्यात येणार असून त्यातून निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये भव्य ग्रँड फिनाले मुंबई मध्ये पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

स्पर्धेचे परीक्षण अश्मीक कामठे, जयेश पाटील, सोपान शेडगे, सौम्या नायर, केतन आरमरकर, जयश्री एम यांनी केले तर सूत्रसंचालन कोमल, तनुजा यांनी केले.

# पोलिस भरतीसाठी लेखी परीक्षा उद्या

**पुणे (दै. संध्या) :**

जिल्ह्यातील ८८ रिक्त पोलिस पदांच्या भरतीसाठी रविवारी (ता. १५) लेखी परीक्षा होत आहे. ११३५ उमेदवार परीक्षा देणार आहेत. उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी केले आहे. ही लेखी परीक्षा ताराबाई पार्क येथील स्वामी विवेकानंद कॉलेज व ज्युनिअर कॉलेजमध्ये सकाळी अकरा ते दुपारी साडेबारादरम्यान होणार आहे. शारीरिक चाचणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ११३५ उमेदवारांसाठी ही परीक्षा होत आहे.

कॉलेजच्या मुख्य इमारतीत ११ खोल्या असून त्या ठिकाणी ३०१ विद्यार्थी, तर ज्युनिअर कॉलेजच्या इमारतीमध्ये १८ खोल्या आहेत. तेथे ८३४ विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था केली आहे. परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्यांकडे मोबाईल हॅण्डसेट, इलेक्ट्रॉनिक उपकरणांना परवानगी नाही.

# महिला दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शन सत्र उत्साहात संपन्न

**पुणे (दै. संध्या) :**






वयाला मर्यादा नसते, उतारवयातही महिलांचा उत्साह दांडगा असतो.महिलांच्या उत्साहाचे मोल अगणित आहे,त्याच अनुषंगाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून"पालवी महिला ज्येष्ठ नागरिक संघ,आकुर्डी, या संस्थेच्या संस्थापिका-अध्यक्षा शोभा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कबीर बाग उद्यान आकुर्डी येथे महिलांसाठी मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपमहापौर सौ.शैलजा मोरे तसेच नगरसेविका वैशाली काळभोर या उपस्थित होत्या.तसेच या कार्यक्रमासाठी अँड.अनिशा फणसळकर समुपदेशक व सायकोथेरपीस्ट प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.सदरील कार्यक्रमात सर्व सभासदांसाठी चिठ्ठी उचलून बक्षीस या धर्तीवर सर्वांना बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला.या कार्यक्रमाअंतर्गत स्वतःला शांत ठेवून मन एकाग्र करुन आपल्या आयुष्यातील आनंद कसा वाढवावा यासाठी अँड.अनिशा फणसळकर यांनी सर्व महिला सभासदांना मार्गदर्शन केलेच तसेच प्रत्यक्ष व्हिज्युलाईज मेडिटेशन देऊन एका वेगळ्या अनुभवाची अनुमती देखील प्राप्त करून दिली.संस्थेतील सर्व सभासद महिला ६०ते८०या वयोगटातील होत्या मात्र त्यांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत अशा प्रकारचे कार्यक्रम आमच्यासाठी पुन्हा आणि वारंवार घ्या अशी सूचना केली.सदर कार्यक्रमाची सांगता सुग्रास अशा भोजनाने झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वैष्णवी जाधव, यश भिडे यांना शो जम्पिंग मध्ये सुवर्ण

- पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेला प्रारंभ
- स्टेट इक्वेस्ट्रियन असोसिएशनचा सहभाग

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेत दुसऱ्या दिवशी शो जम्पिंग फॉल्ट अँड आऊट प्रकारात पुण्यातील दिग्विजय हॉर्स रायडिंग अकॅडमीच्या वैष्णवी जाधव, यश भिडे यांसह आरएमएलएसएस कॉलेजच्या पूर्वजा खेडकर, दिग्विजय हॉर्स रायडिंग अकॅडमीच्या साईशा पाटील आणि ला फेन्सीच्या अमायशा असीम यांनी आपापल्या गटात सुवर्णपदक पटकावले. स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा सुरु आहे. स्पर्धेत स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग आहे. शो जम्पिंग फॉल्ट अँड आऊट प्रकारात खुल्या गटात वैष्णवी जाधव (सुवर्ण), कारमजीत सिंग (रौप्य), रंभान सिंग (ब्राँझ) यांनी यश मिळविले. तर, युवा गटात यश भिडे (सुवर्ण), तन्वी जाधव (रौप्य), विराज पारखे (ब्राँझ) यांनी पदकांची कमाई केली. ज्युनिअर गटात पूर्वजा खेडकर हिने सुवर्ण, अनुम अन्सारी याने रौप्य आणि ब्राँझ पदक मिळविले. चिल्ड्रेन १ गटात साईशा पाटील आणि चिल्ड्रेन २ गटात अमायशा असीम यांनी सुवर्णपदक पटकाविले. ऑलिम्पिकमधील खेळाचा वेगळा प्रकार असलेल्या अश्वारोहण स्पर्धेचा हा थरार दि. १५ मार्च पर्यंत स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर दररोज सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ७ यावेळेत पुणेकरांना अनुभवता येणार आहे. स्पर्धा पाहण्यासाठी प्रवेश विनामूल्य असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डी. वाय. पाटील संघाचे दुहेरी यश

- मुलांपाठोपाठ मुलींच्या गटातही बाजी, आर्की क्रिकेट स्पर्धा

पुणे (दैनिक संध्या) : डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (एसएसएमएससीओए) यांच्या वतीने आयोजित विद्याश्री डेव्हलपर्स आर्की क्रिकेट अजिंक्यपद २.० स्पर्धेत मुलींच्या गटाचे विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत डी. वाय. पाटील कॉलेजच्या संघानेच मुलांच्या गटाचेही विजेतेपद मिळवले होते. त्यामुळे डी. वाय. पाटील कॉलेजने दुहेरी यशाचा आनंद साजरा केला. सहकारनगर येथील शिंदे हायस्कूलच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चर चे चेअरमन विकास अचलेकर, राज्याचे नगररचना विभाग सहाय्यक संचालक महेंद्र परदेशी, विद्याश्री डेव्हलपर्सचे अतित अदमुलवार, डॉ. केतन कुंभार अशोक शिंदे यांसह महाविद्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते. डी. वाय. पाटील संघाने अंतिम लढतीत श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या संघावर (एसएसएमएस-१) सात गडी राखून विजय मिळवला. एसएसएमएस संघाला निर्धारित ५ षटकांत २ बाद ३३ धावाच फलकावर लावता आल्या. डी. वाय. पाटील संघाने विजयी लक्ष्य अखेरच्या चेंडूवर एक गडीच्या मोबदल्यात पूर्ण केले.

# बारामती नगरपालिकेत 'महिला दिन' उत्साहात साजरा

**कायदेशीर प्रबोधन आणि सक्षमीकरणावर भर**

**बारामती (दै. संध्या) :**

बारामती नगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने 'महिला दिन' निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात महिलांच्या कायदेशीर हक्क,मानसिक,आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आणि कायदेशीर हक्क

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक अँड.प्रिया गुजर-महाडिक यांनी सर्वप्रथम दिवंगत नेते अजितदादा यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना 'कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्धचा कायदा (POSH Act)' आणि महिलांना मिळणाऱ्या इतर कायदेशीर संरक्षणाबद्दल सविस्तर माहिती दिली. "नोकरी करणाऱ्या महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.तसेच,बदलत्या जीवनशैलीत महिलांचे 'मानसिक आरोग्य' कसे जपावे,यावरही त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

नगरपालिकेचे नगराध्यक्ष सचिन सातव यांनी महिला सक्षमीकरणाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली.ते म्हणाले, "नगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात महिलांचे आरोग्य,रोजगार निर्मिती आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी विशेष तरतूद करण्यात येईल." या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.



कार्यक्रमात महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सविता जाधव, उपनगराध्यक्षा सौ.श्वेता नाळे आणि सौ.वनिता सातकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी महिलांना स्वावलंबी होण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी प्रेरणादायी विचार मांडण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन महिला व बालकल्याण समितीमार्फत करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन खोरे यांनी केले,तर आभार प्रदर्शन उपसभापती रूपाली मलगुंडे यांनी केले. या वेळी बारामती नगरपालिकेच्या सर्व महिला नगरसेविका, नगरपालिका कर्मचारी, मेडिकल कॉलेजचे कर्मचारी आणि बारामती शहरातील विविध क्षेत्रांतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# 'लक्ष्मी निवास'मध्ये राजच्या प्रेमाचा आक्रमक पैलू

**पुणे (दै. संध्या) :**



झी टीव्हीवरील कौटुंबिक मालिका 'लक्ष्मी निवास' आपल्या भावनिक कथाकथन आणि अनेक स्तर असलेल्या पात्रांमुळे प्रेक्षकांचे सातत्याने मनोरंजन करत आहे. मध्यमवर्गीय कुटुंबाची स्वप्ने आणि नातेसंबंधांभोवती फिरणारी ही कथा असून प्रियोम देव गुज्जर यात राज बुंदेला हा पात्र साकारत असून तो विशेष लक्ष वेधून घेत आहे. अभिनेत्री रिया मुंजाल साकारत असलेल्या भूमिकाचा मोहक आणि परिपूर्ण जोडीदार म्हणून तो प्रेक्षकांमध्ये खास लोकप्रिय झाला आहे. शांत स्वभावाचा आणि मनापासून दुसऱ्यांची काळजी घेणारा असा श्रीमंत उद्योजक म्हणून ओळख करून देण्यात आलेला राज आतापर्यंत प्रेक्षकांना एक आदर्श, पूर्णपणे "ग्रीन फ्लॅग" वाटत होता, ज्याचे भूमिकावर मनापासून प्रेम आहे आणि तिला आनंदी ठेवण्यासाठी काहीही करणारा असा आहे. मात्र, कथानक जसजसे पुढे सरकत आहे तसतसा प्रेक्षकांना राजच्या स्वभावातही एक अनपेक्षित बदल दिसू लागतो. सुरुवातीला ज्याला निरागस आणि शुद्ध प्रेम समजले जात होते, त्याच प्रेमात आता हळूहळू आसक्ती आणि मालकी हक्काची छटा जाणवू लागली आहे.

# प्रथमेश शेरला आघाडीवर

पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेत सलग सहावा विजय



**पुणे (दै. संध्या) :**

प्रथमेश शेरला याने पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सहा फेऱ्यांअखेर सहा गुणांसह आघाडी घेतली आहे. पुणे जिल्हा सर्कलच्या सहकार्याने होणारी ही स्पर्धा लॉ कॉलेज रोडवरील भांडारकर इन्स्टिट्यूट सुरू आहे. अद्विक अगरवाल आणि भूवन शितोळे प्रत्येकी ५.५ गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या पटावर पांढऱ्या मोहरांसह खेळताना प्रथमेशने सौरभ म्हामणेला पराभूत केले आणि आपला विजयी धडाका कायम राखला.

निकाल : खुला गट - सहावी फेरी - प्रथमेश शेरला (६) वि. वि. सौरभ म्हामणे (४.५), अद्विक अगरवाल (५.५) वि. वि. अभिजित जोशी (४.५), भूवन शितोळे (५.५) वि. वि. केविन डिसूझा (४), कल्पेश देवांग (४) पराभूत वि. आरुष डोळस (५), दिपांकर कांबळे (४) पराभूत वि. श्लोक माळी (५), हेरंब भागवत (५) वि. वि. श्रेयस हापसे (४), अनिरुध लिमये (४.५) वि. वि. रोहन ढोरे (४), प्रथमेश देवडिकर (३.५) पराभूत वि. मिहीर सरवदे (४.५), तन्वी कुलकर्णी (३.५) पराभूत वि. श्रावणी उंडळे (४.५), संकेत यादव (४.५) वि. वि. चंद्रकांत डोंगरे (३.५).

११ वर्षांखालील गट - सर्वज्ञ बालगुडे (५.५) वि. वि. अर्जुन कौलगुड (४.५), राघव पावडे (५) बरोबरी वि. तिर्थ कोद्रे (५), रुद्रांश केरकर (४) पराभूत वि. रेयांश कमेरकर (५), गोरांक्ष खंडेलवाल (४) पराभूत वि. ऋत्वी हरपुडे (५), रेयांश चौधरी (४) पराभूत वि. विश्वजा देशमुख (५).

# फ्लिपकार्टने वाढवली स्मार्ट कुलिंग उत्पादन श्रेणी

**पुणे (दै. संध्या) :**




फ्लिपकार्ट इंडिया या होमग्रोन ई कॉमर्स मार्केटप्लेस तर्फे आज त्यांच्या मंचावरुन आता मोटोरोला एअरकंडिशनर्सची श्रृंखला उपलब्ध करुन देत असल्याची घोषणा करण्यात आली, या मंचावरुन आता नवीन एअर कंडिशनिंगची श्रेणी उपलब्ध होणार असून यांत कोणत्याही प्रकारचे जोडणी शुल्क किंवा खरेदी नंतरच्या उपकरणांची खरेदीचा त्रास ग्राहकांना होणार नाही. ही नवी श्रृंखला सर्वसमावेशक अशा खर्चासहीत रु.२८९९०/- या सुरुवातीच्या किंमतीपासून उपलबध्द होणार आहे. भारतीय ग्राहक हे अगदी सखोलपणे टनेज आणि एनर्जी रेटिंगचा अभ्यास करुन एअर कंडिशनर्सची खरेदी करत असताना दुसरीकडे त्यांना खरेदी केल्यानंतरचे विविध खर्च करावे लागतात ज्यामुळे खर्चाचा आकडा वाढतो. मोटोरोला एअरकंडिशनरची श्रृंखला या आव्हानाचा मुकाबला अतिशय पारदर्शक आणि सर्वसमावेशक अशा किंमतीच्या मॉडेलने करत असून यामध्ये जोडणी आणि गरजेच्या सर्व वस्तू उपलब्ध असतील. व्यावसायिक पध्दतीची जोडणी करण्यासह उच्च दर्जाची कॉपर पाईपिंग, वॉल माऊंट स्टॅन्ड आणि तीन वर्षांची गॅस फिलिंग ॲश्युरन्स ही आता एकाच किंमतीत उपलब्ध असल्याने ग्राहकांना या उकाड्यात चिंतामुक्त आणि पारदर्शक व्यवहार करणे शक्य होणार आहे. फ्लिपकार्टच्या लार्ज ॲप्लायन्सेस चे व्हाईस प्रेसिडेंट राकेश कृष्णन यांनी सांगितले " भारतीय घरांमध्ये एअर कंडिशनर्स हे उत्पादन सर्वाधिक संशोधन केल्या नंतर विचारपूर्वक निर्णय घेऊन खरेदी केले जाते, विशेषकरुन त्यांना उन्हाळ्यापूर्वी अधिक मागणी असते. पण अनेकवेळा नवीन खरेदीचा आनंद हा अचानक उद्भवणाऱ्या इन्स्टॉलेशन फी मुळे मावळतो. नवीन मोटोरोलाच्या या एसी रेंज आणि त्यांच्या झिरो हिडन कॉस्ट मॉडेल मुळे आम्ही हा अंतिम अडथळा दूर करुन खरोखरचा आनंददायी अनुभव देऊ करतो. त्याच बरोबर या सुरुवाती मुळे प्रिमियम तंत्रज्ञानाच्या उत्पादनांचे लोकशाहीकरण करण्याची आमची वचनबध्दता वाढवून आमच्या वैविध्यपूर्ण उत्पादन श्रृंखलेसह मुल्यावर्धित सेवांची पध्दती देऊन ग्राहकांचा एकूण आत्मविश्वास वाढवत आहोत."

मोटोरोला एअर कंडिशनर्स च्या उत्पादन श्रेणींमध्ये इन्व्हर्टर टेक्नॉलॉजीची उत्पादने, उर्जा बचत करणारी आणि भारतीय हवामानासह विविध आकाराच्या खोल्यांनुसार क्षमतेचे पर्याय उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. व्यावसायिक इन्स्टॉलेशनची रक्कम मूळ किंमतीत जोडलेली असल्याने सिस्टमची जोडणी ही योग्य स्तर आणि कार्यक्षमता वाढवून टिकाऊपणास मदत प्राप्त होते. ग्राहक आता अगदी सखोल अभ्यास करुन उत्पादनाची स्पेसिफिकेशन्स, मॉडेल्स, टनेज आणि उर्जा रेटिंग्ज नुसार बुक करुन डिलिव्हरी शेड्युल आणि इन्स्टॉलेशन सुध्दा फ्लिपकार्टच्या मंचावरुन प्राप्त करु शकतील.

इंडिया एमबीजी चे व्यवस्थापकीय संचालक टी एम नरसिंम्हन यांनी सांगितले " मोटोरोला ने जागतिक स्तरावर आपले नाव हे सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञानाने युक्त उत्पादने गुणवत्ता, विश्वसनीयता आणि नाविन्याने युक्त देणारी म्हणून कमावले आहे. आंम्हाला अभिमान वाटतो की आमची ही परंपरा आता आम्ही भारतात घरगुती उत्पादनांच्या श्रेणीतही वाढवत आहोत. फ्लिपकार्ट बरोबरच्या भागीदारी मुळे आम्ही फक्त उच्च क्षमतेची कुलिंग उत्पादनेच सुरु करत नाही तर आम्ही प्रथमच किंमतीसह सेवांसाठी पारदर्शक दृष्टिकोन देऊन आमच्यावरील ग्राहकांचा विश्वास दृढ करत आहोत." सर्वसाधारणपणे बाजारपेठेत इन्स्टॉलेशन चार्जेस हे कशा प्रकारची जोडणी आहे त्या प्रमाणे रु १,५०० ते ३,५०० इतकी असते, त्याच बरोबर अधिकची उपकरणे आणि ॲक्सेसरीज चा खर्च ग्राहकांना सोसावा लागतो. त्याच बरोबर काही विशिष्ट काळानंतर देखभाल खर्चाचा सुध्दा भार सोसावा लागतो उदाहरणार्थ मालकीच्या खर्चा मध्ये गॅस भरण्याचा सुध्दा खर्च सोसावा लागतो. हे सर्व खर्च एकाच किंमतीत मिळवण्यात आल्याने खरेदीचा प्रवास अधिक सोपा होतो ज्यामुळे लार्ज ॲप्लायन्सेस भागात सुधारीत पारदर्शकता देणे शक्य झाले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### सुप्रभात महिला मंडळात सावित्रीबाई फुले पुण्यतिथी आणि जागतिक महिला दिन साजरा

मुंबई (दैनिक संध्या) : विक्रोळी कन्नमवार नगरातील सुप्रभात महिला मंडळात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी आणि जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएसचे अध्यक्ष हरिशचंद्र पांचाळ व विक्रोळीतील सेवाभावी डॉ.जयश्री पांचाळ, मंडळाच्या अध्यक्षा अनुराधा कल्याणकर,सेक्रेटरी आसावरी भोईटे,खजिनदार प्राची रेडकर प्रतिभा धुंदुर आदि मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी महिलांच्या समस्यांबाबत इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएसच्या वतीने विशेष वैद्यकीय शिबीर घेण्यात आले. डॉ.सोनल परेलकर(सर्जन), डॉ. मधुश्री वेंकट,गायनॅकॉलॉजिस्ट यांनी महिलांच्या वैद्यकीय चाचण्या घेतल्या व त्यांना मार्गदर्शन केले.

### छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुन:स्थापना

पुणे (दैनिक संध्या) : राज्य सरकारने गेली अनेक वर्षे कामकाज बंद असलेली "छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुन: स्थापना केल्याबद्दल राज्य सरकारचे हार्दिक अभिनंदन. पुणे जिल्हा ग्रंथालय संघाने अनेक महिन्यांपासून केलेल्या मागणीस यश आले आहे. आज रोजी राज्य सरकारच्या विविध प्रकाशन संस्थामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवर फक्त तीन पुस्तके ही संख्या तोकडी असून ती सुध्दा सध्या उपलब्ध नाहीत. राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुन: स्थापना केल्यामुळे वाचकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध साहित्य उपलब्ध होण्याची आशा निर्माण झाली आहे. तरी कृपया राज्य सरकारने सदर चरित्र साधने प्रकाशन समितीस जास्तीत जास्त निधी घ्यावा ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने प्रकाशन समिती तसेच महाराज सयाजीराव गायकवाड यांचे साहित्य नाममात्र किंमतीत उपलब्ध व्हावे. तसेच दिनदयाल उपाध्याय यांचे १९ खंड शासन मान्य ग्रंथालयास मोफत दिले त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचे साहित्य शासनमान्य ग्रंथालयांना मोफत उपलब्ध व्हावे ही पुणे जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने नम्र विनंती. पुन्हा एकदा राज्य सरकारने गेली अनेक वर्षे कामकाज बंद असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीचे कामकाज सुरू केल्याबद्दल हार्दिक आभिनंदन.

### राष्ट्रपतींच्या हस्ते अक्षय पात्रच्या 5 अब्ज मध्यान्ह भोजन टप्प्याचा गौरव

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते अक्षय पात्र फाऊंडेशनने ५ अब्ज (५ बिलियन) मध्यान्ह भोजन वितरणाचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल तसेच संस्थेच्या २५ वर्षांच्या सामाजिक सेवेचा गौरव करण्यात येणार आहे. भारत सरकारच्या पीएम पोषण योजनेचा हा महत्त्वाचा भाग असून या उपक्रमातून बालपोषण आणि शिक्षणाला चालना दिली जात आहे. या कार्यक्रमाची थीम "विकसित भारतासाठी सुपोषित व सुशिक्षित भारत" अशी असून बालपोषण आणि शिक्षणाच्या माध्यमातून विकसित भारत घडवण्याचा संदेश यामधून दिला जाणार आहे. हा कार्यक्रम १७ मार्च २०२६ रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्र (RBCC) येथे आयोजित करण्यात येणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान सन्माननीय अतिथी म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहतील. या वेळी अक्षय पात्र फाऊंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष मधू पंडित दासा, उपाध्यक्ष चंचलापती दासा, विश्वस्त मंडळाचे सदस्य, वरिष्ठ सरकारी अधिकारी, धोरणकर्ते, दानशूर व्यक्ती, भागीदार आणि समर्थक उपस्थित राहणार आहेत. तसेच या उपक्रमाचा लाभ घेतलेल्या काही माजी विद्यार्थी, पालक, सरकारी शाळांचे शिक्षक आणि कर्मचारीही कार्यक्रमाला उपस्थित राहतील. २००० साली स्थापन झालेल्या अक्षय पात्र फाऊंडेशनने शाळांमधील भूक कमी करण्यासाठी आणि मुलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी पौष्टिक मध्यान्ह भोजन पुरविण्याचा उपक्रम सुरू केला. सध्या ही संस्था भारताच्या १६ राज्यांमध्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये २.३५ दशलक्षाहून अधिक विद्यार्थ्यांना दररोज पौष्टिक मध्यान्ह भोजन पुरवत आहे. या उपक्रमामुळे देशातील लाखो मुलांना पोषणासोबत शिक्षणाची संधी मिळत असून बालपोषण आणि शालेय शिक्षणाला महत्त्वपूर्ण बळ मिळत आहे.

### जन्मजात हृदय दोष असलेल्या नवजात बाळाला दिले नवीन जीवन

मुंबई (दैनिक संध्या) : नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई ने एका जटिल कार्डियाक हस्तक्षेप प्रक्रियेद्वारे - पीडीए (पेटंट डक्टस आर्टेरिओसस) स्टेंटिंगद्वारे गंभीर जन्मजात नलिकांवर अवलंबून असलेल्या हृदय दोष असलेल्या पाच दिवसांच्या नवजात बाळाचे प्राण यशस्वीरित्या वाचवले. त्वचेचा तीव्र निळसरपणा (सायनोसिस) च्या तक्रारींसह नवजात बाळाला महाराष्ट्रातील एका लहान शहरातील बालरोगतज्ज्ञांकडे आणण्यात आले. चाचण्यांमध्ये केवळ ६५ टक्के धोकादायकपणे कमी ऑक्सिजन संपृक्तता आढळून आली. फुफ्फुसांना पुरेसा रक्तपुरवठा होत नसलेल्या गंभीर सायनोटिक जन्मजात हृदयरोगाचा संशय असल्याने, स्थानिक डॉक्टरांनी ताबडतोब मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमधील तज्ज्ञांशी संपर्क साधला आणि आपत्कालीन रेफरलची व्यवस्था केली. बालरोगतज्ज्ञांच्या हृदयरोगतज्ज्ञांच्या पथकाच्या सल्ल्यानुसार, नवजात बाळाला रुग्णवाहिकेने हलवण्यापूर्वी त्याला प्रोस्टाग्लँडिन E1 हे जीवनरक्षक औषध देण्यात आले. १२ तासांचा प्रवास असूनही, बाळाला सुरक्षितपणे रुग्णालयात पोहोचवण्यात आले. सखोल तपासणीनंतर, बाळाला फुफ्फुसीय ॲट्रेसिया, वेंट्रिक्युलर सेप्टल दोष आणि लहान पेटंट डक्टस आर्टेरिओसस (PDA) असल्याचे निदान झाले. या स्थितीत, हृदयाच्या उजव्या बाजूला आणि फुफ्फुसांना जोडणारी सामान्य धमनी (फुफ्फुसीय धमनी) अनुपस्थित आहे. गर्भाच्या नैसर्गिक रचनेतील PDA मधून रक्तप्रवाह झाल्यामुळे नवजात बाळ तात्पुरते वाचले. बहुतेक PDA जन्माच्या दोन ते सात दिवसांत आपोआप बंद होत असल्याने, जीवनरक्षक हस्तक्षेप आवश्यक होता. कार्डिया टीमने कार्डियाक कॅथेटेरायझेशन लॅबमध्ये PDA स्टेंटिंग केले, ही एक कमीत कमी आक्रमक परंतु तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची प्रक्रिया होती. सुमारे एक तासाच्या प्रक्रियेदरम्यान, PDA मध्ये एक लहान स्टेंट यशस्वीरित्या ठेवण्यात आला, ज्यामुळे फुफ्फुसांमध्ये अखंड रक्तप्रवाह सुनिश्चित झाला आणि बाळाची ऑक्सिजन पातळी त्वरित स्थिर झाली. नवजात बाळाची प्रकृती झपाट्याने सुधारली आणि पाच दिवसांनी त्याला स्थिर स्थितीत घरी सोडण्यात आले. सहा ते आठ महिन्यांच्या वयात बाळासाठी निश्चित सुधारात्मक हृदय शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन आहे. या प्रकरणाची माहिती देताना, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई डॉ. सुप्रतिम सेन म्हणाले, "नलिकांवर अवलंबून असलेल्या हृदय दोषांमध्ये वेळ हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. लवकर निदान, त्वरित वैद्यकीय स्थिरीकरण आणि वेळेवर हस्तक्षेप जीवन आणि मृत्यूमध्ये फरक करू शकतो.

# पत्रकारिता आणि समाजसेवेतून जीवनदृष्टी विकसित होते

**पुणे (दै. संध्या) :**

पत्रकारिता किंवा सामाजिक कार्याकडे केवळ 'पॅशन' म्हणून नाही, तर 'प्रोफेशन' म्हणून पाहावे असे सांगितले जाते. मात्र या दोन्ही क्षेत्रांत काम करताना केवळ व्यवसायिक अनुभवच नव्हे, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीही विकसित होते, असा सूर विश्व संवाद केंद्राच्या वतीने आयोजित 'कर्तृत्ववान ती' या कार्यक्रमात उमटला. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर विश्व संवाद केंद्र पुणे फाउंडेशनतर्फे महिला माध्यमकर्मींसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार स्वाती राजे, कल्याणी सरदेसाई, ईशान्य भारतात कार्यरत सेवाव्रती अलका वैद्य आणि वीणा बेडेकर यांच्याशी संवाद साधण्यात आला. श्रुती मेहता आणि विश्व संवाद केंद्राच्या संपादक अंजली तागडे यांनी मान्यवरांना बोलते केले.




महिला दिनानिमित्त विश्व संवाद केंद्रात चर्चासत्र

स्वाती राजे म्हणाल्या, "१९८७ मध्ये मी पत्रकारितेला सुरुवात केली. त्याकाळी पूर्णवेळ वार्तांकन करणारी कदाचित मी पहिली महिला पत्रकार असावी. वार्ताहर म्हणून मला १४ वर्षे 'बायलाईन' मिळाली नाही, तरी प्रत्येक बातमीमधून मी समृद्ध होत गेले. पुढील प्रवासात संपादकीय दृष्टिकोन महत्त्वाचा ठरला." तसेच कोणतीही भाषा शाळांमधूनच लोप पावत असते, त्यामुळे शाळांमध्ये भाषेबाबत प्रबोधन करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

कल्याणी सरदेसाई यांनी राष्ट्राच्या योजनांमध्ये मुलांना पुरेसे प्राधान्य दिले जात नसल्याची खंत व्यक्त केली. त्या म्हणाल्या, "मुले ही 'व्होट बँक' नसल्याने धोरणकर्त्यांकडून त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. आजही मुलांचे प्रश्न आपल्या प्राधान्यक्रमात नाहीत. आश्चर्याची बाब म्हणजे आपल्या परंपरेत रामायण-महाभारतातही दत्तक मुलांच्या हक्कांविषयी जागरूकता दिसते."

ईशान्य भारतात राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करणाऱ्या वीणा बेडेकर यांनी त्यांच्या कार्याचे अनुभव सांगितले. त्यांनी सांगितले की, पूर्व सीमा विकास परिषदेच्या माध्यमातून मणिपूरमध्ये स्थानिक गरज लक्षात घेऊन विविध शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. अलका वैद्य म्हणाल्या, "आम्ही काम सुरू केले तेव्हा मणिपूरच्या काही भागात स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन 'काळा दिवस' म्हणून पाळला जात होता. शाळांच्या माध्यमातून आम्ही तिथल्या जनजातींमध्ये शिक्षणाची ज्योत तेवत ठेवली आहे. राष्ट्रगीत आणि पसायदानही त्यांना शिकवले. त्यांना आपली नाही, तर आपल्याला पूर्वांचलाची गरज आहे." मणिपूरमधील आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षक प्रशिक्षण वर्ग घेतानाचे अनुभवही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वातंत्र्यलढ्यातील अनेक वीरांगनांच्या त्यागाची आठवण करून देणारे 'भारतकन्या' हे प्रार्थनापर गीत सादर करण्यात आले. विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले, तर सम्राट कदम यांनी आभार मानले.

## स्टॅम्प ड्यूटी गैरव्यवहार प्रकरणांमध्ये 133 कोटींची वसुली

**मुंबई (दै. संध्या) :**

राज्यातील स्टॅम्प ड्यूटी गैरव्यवहाराशी संबंधित प्रकरणांमध्ये आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून मीरा भाईंदर मधील स्टँप ड्युटी गैरव्यवहार प्रकरणी सुमारे 133 कोटी रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली. महसूल विभागाच्या अर्थसंकल्पावरील मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना राज्यमंत्री कदम म्हणाले की, मीरा भाईंदर मधील स्टँप ड्यूटीच्या 492 प्रकरणांची चौकशी सुरू करण्यात आली असून त्यापैकी 350 प्रकरणांमध्ये अंतिम आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित 142 प्रकरणांची चौकशी सुरू असून त्यावर लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल. या प्रकरणांमध्ये आतापर्यंत सुमारे 35 कोटी रुपयांची स्टॅम्प ड्यूटी आणि जवळपास 98 कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असून संबंधितांना नोटिसाही देण्यात आल्या आहेत. या प्रकरणांची अधिक सखोल चौकशी करण्यासाठी नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर दोषींवर पुढील कारवाई करण्यात येईल, असेही कदम यांनी स्पष्ट केले. चारकोप येथील कांदळवन क्षेत्रातील कथित अतिक्रमणाबाबत 48 तासांत जागेची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

## शिल्पा शिंदे लखनौमध्ये ठरल्या 'सेल्फी क्वीन'

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०' मधील अंगूरी भाबीच्या भूमिकेमुळे घराघरात पोहोचलेल्या अभिनेत्री शिल्पा शिंदे यांनी नुकत्याच लखनौ भेटीदरम्यान चाहत्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांना आनंदित केले. आपल्या उत्साही स्वभावामुळे ओळखल्या जाणाऱ्या शिल्पाने चाहत्यांसोबत गप्पागोष्टी करत वेळ घालवला आणि तब्बल १०० हून अधिक चाहत्यांसोबत सेल्फी काढल्या. त्यामुळे या भेटीचा प्रत्येक क्षण चाहत्यांसाठी संस्मरणीय ठरला.



अंगूरी भाबीला प्रत्यक्ष भेटण्याचा आनंद आणि तिच्यासोबत सेल्फी घेण्याची संधी मिळाल्याने चाहत्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. या संवादामुळे लखनौमधील चाहत्यांशी अभिनेत्रीचा खास भावनिक बंध तयार झाल्याचे दिसून आले.

आपला अनुभव सांगताना शिल्पा शिंदे म्हणाल्या, "आपण अनेकदा मित्र-मैत्रिणी किंवा कुटुंबासोबत सेल्फी काढतो, पण चाहत्यांसोबत सेल्फी काढणे हा पूर्णपणे वेगळा आणि खास अनुभव असतो. लखनौमध्ये येण्याची आणि आमच्या मालिकेवर प्रेम करणाऱ्या इतक्या सुंदर लोकांना भेटण्याची संधी दिल्याबद्दल मी एण्ड टीव्हीची आभारी आहे. चाहत्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहून मी भारावून गेले. या सुंदर शहरात चाहत्यांशी गप्पा मारत त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचे क्षण माझ्यासाठी खूप खास आणि संस्मरणीय आहेत."

'भाबीजी घर पर है २.०' ही मालिका दर सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर प्रेक्षकांच्या भेटीला येते. तसेच मालिकेचे सर्व भाग झी5 वरही कधीही पाहता येतात.

## टाटा मोटर्सला देशभरातून ५,०००हून अधिक बसेसची ऑर्डर

**मुंबई (दै. संध्या) :**



भारतामधील सर्वात मोठी व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनी टाटा मोटर्सला देशभरातील विविध राज्य परिवहन उपक्रमांकडून (एसटीयू) ५,०००हून अधिक बसेस आणि बस चेसिसच्या ऑर्डर्स मिळाल्या आहेत. या ऑर्डर्समुळे भारतातील सार्वजनिक परिवहन क्षेत्रात कंपनीचे स्थान अधिक मजबूत झाले असून देशातील पुढील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळणार आहे.

सरकारच्या खरेदी यंत्रणेअंतर्गत स्पर्धात्मक ई-बोली प्रक्रियेच्या माध्यमातून या निविदा मिळाल्या असून संबंधित राज्य परिवहन संस्थांसोबतच्या करारानुसार या बसेसची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे.

टाटा मोटर्स अनेक दशकांपासून सार्वजनिक परिवहन क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. एमएसआरटीसी (महाराष्ट्र), जीएसआरटीसी (गुजरात), एनडब्ल्यूकेआरटीसी (कर्नाटक), टीजीएसआरटीसी (तेलंगणा), बीएसआरटीसी (बिहार), आरएसआरटीसी (राजस्थान), केएसआरटीसी (केरळ), हरियाणा रोडवेज आणि चंदीगड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग यांसारख्या संस्थांकडून या ऑर्डर्स मिळाल्या आहेत.

या संदर्भात टाटा मोटर्सच्या कमर्शियल पॅसेंजर व्हेईकल व्यवसायाचे उपाध्यक्ष व प्रमुख आनंद एस. म्हणाले,

"विविध राज्य परिवहन उपक्रमांकडून मिळालेल्या या ऑर्डर्समुळे टाटा मोटर्सच्या गतीशीलता सोल्युशन्सवर असलेला विश्वास अधोरेखित होतो. आमच्या बसेस आरामदायीपणा, सुरक्षितता आणि दीर्घकालीन विश्वासार्हता लक्षात घेऊन डिझाइन केल्या आहेत. या ऑर्डर्समुळे भारतातील सार्वजनिक परिवहनाच्या भविष्यास आकार देण्याच्या आमच्या बांधिलकीला अधिक बळ मिळाले आहे."

या ऑर्डर्समध्ये टाटा मॅग्ना, टाटा सिटीराइड, टाटा स्टारबस, टाटा स्टारबस प्राइम, टाटा एलपीओ १६१८, एलपीओ १६२२ आणि एलपीओ १८२२ या बस मॉडेल्सचा समावेश आहे. या बसेस इंटरसिटी, लांब पल्ल्याच्या आणि शहरांतर्गत वाहतुकीसाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत.

टाटा मोटर्सचे व्यावसायिक प्रवासी वाहन पोर्टफोलिओ ९ ते ५५ आसन क्षमतेच्या वाहनांपर्यंत विस्तारलेले आहे.

कंपनीचा 'Sampoorna Seva 2.0' हा वाहन जीवनचक्र व्यवस्थापन कार्यक्रम देखभाल सहाय्य, वेळेत दुरुस्ती, अस्सल स्पेअर पार्ट्स आणि ब्रेकडाउन सहाय्य यांसारख्या सुविधा प्रदान करतो. देशभरातील ४,५००हून अधिक सेल्स व सर्व्हिस टचपॉइंट्सच्या नेटवर्कमुळे कंपनी शहरी तसेच ग्रामीण भागात सुरक्षित, कार्यक्षम आणि विश्वासार्ह सार्वजनिक परिवहन सेवा सक्षम करत आहे.

## वन्यप्राणी–मानव संघर्ष रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर

**मुंबई (दै. संध्या) :**


वाघ व बिबट्यांचे हल्ले, वन्यप्राणी–मानव संघर्ष आणि वनसंवर्धनाच्या उपाययोजनांसाठी तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली. अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभा सदस्यांनी वन विभागासंदर्भातील उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना वन मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, राज्यात वाघ-बिबट्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण, त्यांचे संरक्षण आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी सॅटेलाईट व आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यासाठी वन विभागाला जमीनीच्या बदल्यात मिळणारा निधी, 'एमडीएस'मधून उभारण्यात येणारे कर्ज आणि इतर स्रोतांद्वारे मिळून सुमारे 14 हजार कोटी रुपये उपलब्ध होतील. चर्चेत वाघ-बिबट्यांचा प्रादुर्भाव, वनपट्टे, वनउद्यान उभारणी, वनजमिनीवरील अतिक्रमण, तसेच वन्यप्राणी हल्ल्यातील पीडित कुटुंबांना मदत अशा विविध विषयांवर सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना वन मंत्री नाईक म्हणाले की, वन विभागाबाबत लोकांच्या भावना सकारात्मक होत आहेत. राज्यातील 21 टक्के क्षेत्र वनाखाली असून ते 33 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. राज्य सरकारने 300 कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला असून यावर्षी 10 कोटी झाडे लावण्यात आली आहेत.

# जागतिक अनिश्चिततेतही पुण्यातील एसएमईंचा विकासावरील विश्वास कायम

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पुणे: जागतिक बाजारपेठांमध्ये भू-राजकीय तणाव आणि व्यापारातील विस्कळीतपणामुळे अनिश्चिततेचे वातावरण असले तरी पुण्यातील लघु व मध्यम उद्योग (एसएमई) आपल्या विकासाच्या शक्यतांबाबत ठाम आत्मविश्वास दाखवत आहेत. स्थिर देशांतर्गत मागणी आणि धोरणात्मक व्यावसायिक नियोजनाच्या बळावर भारतीय एसएमई विस्ताराच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे विविध राष्ट्रीय अहवालांतून स्पष्ट होत आहे.

सिडबी (SIDBI) एमएसएमई आउटलुक सर्व्हेनुसार, आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत आयात शुल्काचा दबाव असल्याने आशावादात काहीशी घट दिसली असली तरी सणासुदीचा काळ, स्थिर बाजारपेठेतील मागणी



आणि जीएसटीचे सुलभीकरण यांसारख्या उपाययोजनांमुळे आगामी तिमाहींबाबत सकारात्मक अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहेत.

पीएचडी चेंबरच्या एसएमई मार्केट सेंटिमेंट इंडेक्सनुसार, मागणी आणि रोजगाराबाबत काही चिंता असल्या तरी देशातील उद्योजक भांडवली गुंतवणुकीत वाढ करण्याच्या तयारीत आहेत. पुरवठा साखळीतील सुधारणा आणि सक्रिय इन्व्हेंटरी व्यवस्थापनामुळे उद्योग आगामी काळातील वाढीसाठी सज्ज असल्याचेही दिसून येते.

पुणे हे भारतातील सर्वात गतिशील एसएमई परिसंस्थांपैकी एक मानले जाते. जिल्ह्यात ४.५ लाखांहून अधिक नोंदणीकृत एमएसएमई आहेत. त्यामध्ये जवळपास १ लाख उत्पादन युनिट्स आणि ३.५ लाख सेवा क्षेत्रातील उद्योग समाविष्ट असून त्यामुळे पुणे महाराष्ट्रातील सर्वात मोठे आणि वैविध्यपूर्ण एमएसएमई केंद्र ठरते.

अभियांत्रिकी कौशल्य, ऑटो कंपोनंट मॅन्युफॅक्चरिंग, आयटी सेवा, अचूक उत्पादन आणि कुशल मनुष्यबळाची उपलब्धता यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळातही पुणे स्पर्धात्मक आघाडीवर आहे. स्थानिक उद्योग तंत्रज्ञान उन्नती, उत्पादन वैविध्यीकरण आणि निर्यात विस्तारासाठी गुंतवणूक करत आहेत.

कोटक महिंद्रा बँकेचे एसएमई प्रमुख शेखर भंडारी म्हणाले, "भारतातील एसएमई, विशेषतः पुण्यासारख्या औद्योगिक केंद्रांतील उद्योग अपवादात्मक स्पष्टता आणि महत्त्वाकांक्षा दाखवत आहेत. त्यांचा दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध दृष्टिकोन त्यांना भविष्यातील मोठे उद्योगसमूह बनण्याच्या दिशेने नेतो."

वाढत्या उद्योग मागणीला प्रतिसाद देण्यासाठी कोटक महिंद्रा बँक पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर यांसारख्या एमएसएमई केंद्रांमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे. या विस्तारामुळे उद्योगांना जलद आणि सुलभ आर्थिक सेवा उपलब्ध होणार आहेत.

**औद्योगिक क्षेत्रांत वाढती गुंतवणूक**

चाकण, तळेगाव, रांजणगाव आणि हिंजवडी यांसारख्या औद्योगिक पट्ट्यांमध्ये उद्योग ऑटोमेशन वाढवत आहेत, पुरवठा साखळी अधिक मजबूत करत आहेत आणि विशेष उत्पादने विकसित करत ग्राहक नेटवर्क विस्तारत आहेत. जागतिक बदलत्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी कार्यक्षमता आणि निवडक गुंतवणुकीवर उद्योग भर देत असल्याचेही निरीक्षण आहे.

अहमदनगर, बारामती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसह व्यापक पुणे प्रदेश मजबूत कनेक्टिव्हिटीमुळे एक प्रभावी एसएमई कॉरिडॉर तयार करत आहे. कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि उद्योजकीय संस्कृतीमुळे उत्पादन, सेवा आणि नव्या क्षेत्रांमध्ये उद्योग विस्तारास चालना मिळत आहे.

तज्ज्ञांच्या मते, पुण्यातील एसएमईंचा भविष्याभिमुख आणि धोरणात्मक दृष्टिकोन त्यांना इतर औद्योगिक केंद्रांपेक्षा वेगळे ठरवतो. मजबूत लॉजिस्टिक व्यवस्था आणि देशांतर्गत पायाभूत सुविधांचा पाठिंबा मिळाल्यामुळे हे उद्योग जागतिक अनिश्चिततेचे रूपांतर शाश्वत विकासाच्या संधींमध्ये करत आहेत.

यामुळे पुणे तसेच देशभरातील एसएमई महत्त्वाकांक्षा, स्थिरता आणि दीर्घकालीन दृष्टिकोनामुळे भारताच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.




## कचरा व्यवस्थापनाची समस्या कायमस्वरूपी मार्गी लावा

■ नगरसेविका स्नेहा कलाटे यांची महापालिका सभेत मागणी

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रभाग क्रमांक २६ पिंपळे निलख, कस्पटे वस्ती, वाकड मधील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांनी ठामपणे आवाज उठवला. परिसरातील कचरा व्यवस्थापनाची समस्या कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.

प्रभाग २६ मधील कचरा संकलनाची व्यवस्था, कचऱ्याची योग्य प्रक्रिया तसेच व्यवस्थापन करताना येणाऱ्या अडचणी या विषयांवर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. परिसरातील वाढत्या कचऱ्याच्या समस्येमुळे नागरिकांच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावर परिणाम होत असल्याची बाबही स्नेहा कलाटे यांनी निदर्शनास आणून दिली.

या समस्येवर तात्पुरते नव्हे तर दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजना राबविणे गरजेचे असल्याचेही कलाटे यांनी स्पष्ट केले. तसेच प्रभागातील स्वच्छता आणि पर्यावरण टिकवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, प्रभागातील नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न सोडवण्यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला जाईल आणि लवकरच या विषयावर योग्य निर्णय होईल, असा विश्वास नगरसेविका स्नेहा कलाटे यांनी व्यक्त केला.

# निधीअभावी दररोज पाणीपुरवठा नाही हे सांगणे दुर्दैवी

## पवना जलवाहिनीवरून राहुल कलाटे सभागृहात आक्रमक

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा १३ मार्च रोजी पार पडली. महिन्याभरानंतर महापालिकेची सर्वसाधारण सभा होत असताना, या कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांवर ठोस कृती काय झाली? याबद्दल प्रशासनाने नेमके उत्तर द्यावे यासाठी भाजपचे नगरसेवक राहुल कलाटे आक्रमक झाले. स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी शहरातील वाकड, ताथवडे, पुनावळेसह रावेत पम्पिंग स्टेशनमधून पाणीपुरवठा होत असलेल्या भागाला नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी पवना जलवाहिनीच्या कामाला निधीसह तात्काळ गती देण्यात यावी, अशी आग्रही मागणी राहुल कलाटे यांनी यावेळी केली.

पाण्यासाठी निधी अभावाचे कारण सांगणे दुर्दैवी असून, स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा होणे हा नागरिकांचा अधिकार आहे. भाजपने सत्तेत येताना पिंपरी चिंचवडकरांना नियमित पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले असून, ते पूर्ण झालेच पाहिजे, असे म्हणत कलाटे यांनी सभागृहात पवना जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याबद्दल आक्रमक भूमिका मांडली.

शुक्रवारी (१३ मार्च) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत स्मार्ट सिटी योजना आढावा, दररोजचे पाणीपुरवठा नियोजन, कचरा व्यवस्थापन अशा महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी भाजपचे नगरसेवक राहुल कलाटे बोलत होते.

निधी अभावी पवना जलवाहिनी प्रकल्प पुढे ढकलताना प्रशासनाला हे समजून घ्यावे लागेल की प्रकल्पाला विलंब होईल तसा त्याचा खर्च देखील वाढतच जाणार आहे. त्यामुळे यावर तातडीने कार्यवाही आवश्यक आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकांना नियमित पाणीपुरवठ्याचे भाजपने आश्वासन दिले आहे. ते पूर्ण करणे आपले आद्य कर्तव्य आहे, असेही कलाटे यावेळी म्हणाले.

पाण्याच्या प्रश्नावर सभागृहाचे लक्ष वेधून घेत कलाटे पुढे म्हणाले, "शहरातील अनेक भागांत पाणीटंचाईच्या तक्रारी कायम आहेत. उन्हाळ्यात त्यात मोठी वाढ होते. पवना धरणातून सोडलेले पाणी रावेत येथील पवना नदीच्या बंधाऱ्यातून उचलले जाते. ते शुद्ध करुन संपूर्ण शहराला पुरविले जाते. महापौरांनी यापूर्वी जलशुद्धीकरण केंद्राला भेट दिली. महिन्याभरात त्यावर पुढे काय कार्यवाही झाली यावर स्पष्टता देण्यात यावी. रावेत पंपिंग स्टेशन इथे पवना नदी पात्रातील पाण्याचा दर्जा खालावत आहे. त्यासाठी २० लाख रुपये देऊन महापालिकेने नेमलेल्या संस्थेमार्फत नेमके काय काम केले जाईल? याबद्दलही स्पष्टता देण्यात यावी, अशी मागणी कलाटे यांनी यावेळी केली.

स्मार्ट सिटी योजनेबद्दल मांडणी करतांना कलाटे म्हणाले की, "सभागृहातील सदस्यांनी मूल्यमापन करताना या योजनेचा आवाका समजून घेतला पाहिजे. पायाभूत सुविधा उभारण्यासाठी या योजनेत फक्त पिंपळे गुरव आणि पिंपळे सौदागर या दोनच गावांचा समावेश होता. त्यामुळे प्रत्यक्ष कामे फक्त या भागापुरती मर्यादित राहिली, मात्र काही "स्मार्ट प्रकल्प" यानिमित्ताने सुरु झाले ज्यांचा उपयोग संपूर्ण शहराला होऊ शकेल. यापैकीच एक म्हणजे "सीसीटीव्ही कॅमेरे" बसवणे. शहराच्या सुरक्षिततेसाठी हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र ठेकेदाराने बसवलेले किती सीसीटीव्ही कॅमेरे आज सुस्थितीत आहेत याबद्दल प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे ठेकेदाराला याच्या देखभाल दुरुस्तीसाठी जबाबदार धरून काम करून घेणे आवश्यक आहे, असेही कलाटे म्हणाले. तसेच या योजनेअंतर्गत येणाऱ्या सर्व उर्वरित कामांचे उत्तरदायित्व निश्चित केले पाहिजे, असेही कलाटे यांनी यावेळी सुचवले.

### पिंपरी चिंचवडसाठी आवश्यक पवना जलवाहिनी प्रकल्प

पवना जलवाहिनी प्रकल्पाला गती देण्याची आवश्यकता आहे. १५ वर्षांपासून ते काम ठप्प आहे. आत्तापर्यंत तब्बल २०० कोटी रुपये खर्च झाले असून, एकूण चारशे कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा खर्च आत्ता तब्बल १२५६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे, तरीही हा प्रकल्प कागदावरच आहे.

नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाने बजेटचे कारण सांगणे दुर्दैवी. स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा करण्याचे भाजपने पिंपरी चिंचवडकरांना आश्वासन दिले आहे. ते पूर्ण झालेच पाहिजे. यासाठी आवश्यक त्या निधीची तातडीने पूर्तता करून पवना जलवाहिनी प्रकल्पाला गती देण्यात यावी.

**– राहुल कलाटे, नगरसेवक, भाजप**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कासारवाडीत गॅस सिलेंडरचा साठा जप्त; अन्न-धान्य पुरवठा विभागाची मोठी कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरात अन्न-धान्य पुरवठा विभागाने मोठी कारवाई करत मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडरचा साठा जप्त केला आहे. कासारवाडी येथे दोन टेम्पोमधून 57 भरलेले आणि 207 रिकामे भारत गॅसचे सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अन्न-धान्य पुरवठा विभागाच्या पथकाने संशयाच्या आधारे कासारवाडी येथे छापा टाकला. यावेळी दोन टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडर आढळून आले. तसेच टेम्पोच्या बाजूला गॅसचे सीलही सापडल्यामुळे या ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यावसायिक गॅसमध्ये बेकायदेशीर रिफिलिंग केले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, जप्त केलेले सिलेंडर आणि टेम्पो ताब्यात घेण्यात आले असून या प्रकरणाचा अधिक तपास अन्न-धान्य पुरवठा विभागाकडून सुरू आहे. संबंधित व्यक्तींची चौकशी केली जात असून नियमांचे उल्लंघन आढळल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्न-धान्य पुरवठा विभागाचे परिमंडळ अधिकारी विजय कुमार क्षीरसागर यांनी दिली आहे.

### रावेतच्या नवीन बंधाऱ्यासाठी 105 कोटींचा निधी द्या – आमदार शंकर जगताप



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या प्रकल्पांना आता वेग आला आहे. आंद्रा धरणातून पाणी उचलण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे हस्तांतरण आणि रावेत येथील ब्रिटिशकालीन बंधाऱ्याचे आधुनिकीकरण या दोन महत्त्वपूर्ण गोष्टीचा पाठपुरावा आमदार शंकर जगताप यांच्याकडून केला जात आहे. यासंदर्भात भाजपा महायुती सरकार सकारात्मक असून, आंद्रा धरणातून पाणी उचलण्यासाठी आवश्यक जमिनीचे हस्तांतर कायमस्वरूपी करणे आणि रावेतच्या नवीन बंधाऱ्यासाठी 105 कोटी रुपयांची निधी देण्याची मागणी आमदार शंकर जगताप यांनी महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अनुदानाच्या मागण्यांदरम्यान केली. या माध्यमातून पाणी टंचाईवर तोडगा निघणार असून, शहरवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले, शहराला हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी मावळ तालुक्यातील मौजे शिरे येथील 0.95 हेक्टर जमीन जलसंपदा विभागाकडून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. या ठिकाणी जॅकवेल, अप्रोच चॅनेल, पंप हाऊस आणि सबस्टेशन उभारले जाणार आहे. मुख्य अभियंता (जलसंपदा) यांनी हा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे पाठवला असून, या जमिनीचे मूल्यांकन व हस्तांतरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. यामुळे आंद्रा धरणाचे पाणी थेट शहरात पोहोचवण्यातील तांत्रिक अडथळे दूर होणार आहेत. दरम्यान शहराला पाणीपुरवठा करणारा रावेत येथील पवना नदीवरील बंधारा ब्रिटिशकालीन असल्याने तिथे मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. या गाळामुळे पाणीपुरवठ्यात अडथळा निर्माण होऊन दररोज सुमारे ५ कोटी लिटर पाणी वाया जाते. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून जुन्या पद्धतीचा बंधारा बदलून तिथे व्हर्टिकल लिफ्ट शाफ्ट (उभी उचल पद्धत) हा तांत्रिकदृष्ट्या प्रगत बंधारा बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधुनिक बंधाऱ्यामुळे गाळ साचण्याची समस्या दूर होईल आणि पाण्याचा अपव्यय थांबेल. या प्रकल्पासाठी १०५ कोटी रुपयांचा सविस्तर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून, त्याला तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली आहे .

## तळवडे येथे भिंत कोसळून पती-पत्नीचा मृत्यू; एक जण जखमी

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड शहरातील तळवडे येथील ज्योतिबा नगर परिसरात वॉल कंपाऊंडचे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. ही घटना शुक्रवारी (दि.१३) सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जागा मालक सदाशिव आगळे यांच्या इंडक्शन थर्मल कंपनीच्या खुल्या प्लॉटभोवती विटांचे वॉल कंपाऊंड बांधण्याचे काम सुरू होते. हे काम कंत्राटदार दीपक देवाजी जाधव (रा. चाकण) यांनी घेतले होते. या बांधकामासाठी लेबर नाक्यावरून मजूर आणण्यात आले होते. काम सुरू असताना अचानक बांधकाम सुरू असलेली भिंत कोसळली आणि तिच्या ढिगाऱ्याखाली सचिन शंकर राठोड (वय ३०) आणि त्यांची पत्नी कोमल सचिन राठोड (वय २५, दोघेही मूळ रा. लोहा, जि. नांदेड) दबले. या दुर्घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर मनोहर भिकू चव्हाण (वय ३८, रा. चाकण) हे किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर देहूगाव येथील इम्पेरियल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.



## पवना नदीत थेट ड्रेनेजचे पाणी.. संबंधितांवर तात्काळ कारवाई करा

*शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या तरस यांची महापालिका सभेत मागणी*

**पिंपरी (दै. संध्या) :**




पवना नदीमध्ये खुलेआम ड्रेनेज व नाल्याचे दूषित पाणी सोडणाऱ्या खाजगी सहकारी संस्था तसेच देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली.

पिंपरी चिंचवड शहराला "स्मार्ट सिटी"चा दर्जा असला तरी प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये मूलभूत समस्या कायम असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रभाग क्रमांक १६ मध्ये रावेत, मामुर्डी, साईनगर, विकासनगर, गुरुद्वारा परिसर, वाल्हेकरवाडी या भागांचा समावेश होतो. मात्र रावेत गावातील काही ठराविक भाग वगळता उर्वरित भागांमध्ये स्मार्ट सिटीच्या सुविधांचा लाभ मिळत नसल्याचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

ऐश्वर्या तरस म्हणाल्या की, संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना नदीची स्थिती अत्यंत चिंताजनक झाली आहे. रावेत बंधारा, मामुर्डी व किवळे परिसरात नदीमध्ये काही मोठ्या गृहप्रकल्पांमधून ड्रेनेज मिश्रित पाणी थेट सोडले जात आहे. तसेच देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतून येणाऱ्या नाल्यांमधील दूषित पाणी देखील पवना नदीत मिसळत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

यामुळे नदीचे प्रदूषण वाढत असून, याच नदीतील पाणी शुद्धीकरण करून पिंपरी चिंचवडकरांना पिण्यासाठी दिले जाते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर पवना नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने तातडीने तपासणी करून संबंधित संस्था व विभागांवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ऐश्वर्या तरस यांनी सभेत केली.

## दूषित पाण्यामुळे २० विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

*मोशी येथील आदिवासी शासकीय वसतिगृहातील धक्कादायक प्रकार*

**पिंपरी (दै. संध्या) :**



मोशी येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहात दूषित पाणी पिल्यामुळे २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वसतिगृहातील दूषित पाणी पिल्यानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, जुलाब आणि मळमळ असा त्रास सुरू झाला. प्रकृती खालावल्याने सर्व विद्यार्थ्यांना तातडीने भोसरी येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर काही विद्यार्थ्यांना घरी सोडण्यात आले असून ८ ते १० विद्यार्थ्यांवर अजूनही उपचार सुरू आहेत. सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे यांनी दिली.

दरम्यान, या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश केला आहे. शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळूनही वसतिगृहातील वॉटर फिल्टर अनेक दिवसांपासून नादुरुस्त असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. याबाबत वारंवार तक्रार करूनही दुरुस्ती न झाल्याने विद्यार्थ्यांना बाहेरचे पाणी पिण्याची वेळ आली, असेही त्यांनी सांगितले. यासंदर्भातील व्हिडिओ विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर व्हायरल करत स्वच्छ पाण्याची मागणी केली होती.

इतकी गंभीर घटना घडूनही आदिवासी प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आपल्या मुलांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. दरम्यान, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते अनिल तिटकारे यांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## नकली नोटांचा हार देत प्रशासनावर हल्लाबोल

■ महापालिका सभेत भ्रष्टाचाराविरोधात राष्ट्रवादीचे नगरसेवक राजू बनसोडे आक्रमक

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज (दि.१३) भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून जोरदार राजकीय वातावरण तापले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक राजू बनसोडे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. सभेला येताना बनसोडे यांनी गळ्यात नकली नोटांचा हार घातला होता. शहरात सुरू असलेल्या कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ त्यांनी हा हार प्रशासनाला भेट देत जोरदार टीका केली. "महापालिकेत काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून भ्रष्टाचार सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. मागे राहिलेल्या चोरांना आवर घाला. जर पैसेच हवेत तर हा हार घ्या," असे म्हणत त्यांनी प्रशासनाला लक्ष्य केले. यावेळी बनसोडे यांनी तत्कालीन आयुक्तांवरही निशाणा साधत प्रशासनाने भ्रष्टाचारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे सभागृहात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

राजू बनसोडे यांच्या या अनोख्या आंदोलनामुळे प्रशासन काही काळ अनुत्तरित झाल्याचे पाहायला मिळाले. शहरातील भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून पुढील काळात राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या निविदांवर प्रश्नचिन्ह

■ संदीप वाघेरे, सुलभा उबाळे यांच्याकडून सखोल चौकशीची मागणी

**पिंपरी (दै. संध्या) :**

मोशी येथे उभारण्यात येत असलेल्या छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या कामांसाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे आणि शिवसेनेच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभा आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात पार पडली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या निविदा प्रक्रियेवरून सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. नगरसेवक संदीप वाघेरे म्हणाले की, इतक्या मोठ्या आणि महत्त्वाच्या प्रकल्पासाठी काढलेल्या निविदांमध्ये केवळ दोनच ठेकेदार सहभागी होणे हे संशयास्पद आहे. "शहरात केवळ दोनच ठेकेदार आहेत का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अनेक विकासकामांच्या निविदा साधारणतः ३० ते ४० टक्के कमी दराने येत असताना काही ठराविक कामांमध्ये दिलेल्याच दरांवर निविदा स्वीकारल्या जात असल्याने शंका निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## प्रभाग २५ मधील 'डीपी प्लॅन' रद्द करा

### महापालिका सभेत नगरसेवक कुणाल वाव्हळकर आक्रमक

**पिंपरी (दै. संध्या) :**




प्रभाग क्रमांक २५ मधील वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरात तयार करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखड्याला (डीपी प्लॅन) आरपीआयचे नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी जोरदार विरोध दर्शवला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत त्यांनी हा मुद्दा उपस्थित करत डीपी प्लॅन तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे.

नगरसेवक कुणाल वाव्हळकर म्हणाले की, प्रारूप विकास आराखड्यात सर्वे क्रमांक १७६, १७७ आणि १७८ या ठिकाणी असलेल्या गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांच्या घरांवरून डीपी प्लॅन आखण्यात आला आहे. या निर्णयामुळे परिसरातील सुमारे हजार ते दीड हजार नागरिकांचे घरे धोक्यात येणार असून अनेक कुटुंबे बेघर होण्याची शक्यता आहे.

या संदर्भात बोलताना त्यांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले. "हा डीपी प्लॅन तारांकित हॉटेलमध्ये बसून बनवलेला आहे. आराखडा तयार करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले गेले नाही. प्रशासनाने पूर्णपणे मनमानी कारभार केला आहे," असे वाव्हळकर यांनी सभागृहात सांगितले.

या आराखड्यामुळे सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर येण्याची वेळ येईल, त्यामुळे नागरिकांच्या हिताचा विचार करून हा डीपी प्लॅन तातडीने रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. दरम्यान, या मुद्द्यावर सभागृहात काही काळ चर्चा झाली प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गॅस दरवाढ कमी करण्याची काँग्रेसची मागणी

चाकण (दैनिक संध्या) : खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे खेड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने स्वयंपाक गॅस दरवाढ कमी करण्याची मागणी करण्यात आली आहे. खेड तालुक्यांत अनेक राज्य, जिल्हा व तालुक्यातून कामानिमित्त अनेक नागरिक आले आहेत. त्या नागरिकांना कुठल्याही प्रकारचा स्वयंपाक गॅस मिळत नाही. गेल्या आठवड्यापासून आजपर्यंत सर्वसामान्य नागरिकांना दोन दोन दिवस रांगेत उभे राहूनही कोणत्याही प्रकारचा स्वयंपाक गॅस सिलेंडर मिळालेला नाही. खेड तालुक्यातील वाढती लोकसंख्या याचा सारासार विचार करून मुबलक प्रमाणात स्वयंपाक गॅस उपलब्ध व्हावा, व पुरवठा केंद्रातून खेड तालुक्यासाठी विशेष कोट्यातून स्वयंपाक गॅस मिळावा, अशी मागणी वंदना सातपुते, चंद्रकांत गोरे यांनी तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे केली आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या वंदना सातपुते, अल्पसंख्याकचे अध्यक्ष जमीर काझी, किसान काँग्रेसचे खेड तालुका अध्यक्ष सुभाष होले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भास्कर तुळवे, संभाजी मोहिते, खेड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत गोरे, सुनील मिंडे आदी उपस्थित होते.

### शामभाऊ राक्षे यांना अंनिसच्या जिल्हा कार्यकारिणीवर संधी



चाकण (दैनिक संध्या) : अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पुणे जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, चाकण येथील उद्योजक शामभाऊ राक्षे यांना अंनिसच्या जिल्हा कार्यकारिणीवर काम करण्याची संधी मिळाली असल्याची माहिती अंनिसचे अध्यक्ष डॉ. अरूण बुरांडे यांनी दिली. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष वसंत कदम, कार्याध्यक्ष अनिल वेल्हाळ, सचिव भारत विठ्ठलदास, डॉ. ज्ञानदेव सरवदे, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण करपे, नवनाथ लोंढे, वामन बाजारे, शुभांगी घनवट, राहुल केदारी, प्रकाश भारद्वाज, अनुराधा काळे, धनंजय कोठावळे, अ‍ॅड. सौरभ बागडे, संतोष रणदिवे, सुरेश बावणकर, अंजली इंगळे, मिलिंद देशमुख, श्रीपाल ललवाणी, रामभाऊ नलावडे, सुभाष सोळंकी, विश्वास पेंडसे, अलका जाधव, राजू जाधव आदी उपस्थित होते. उद्योजक शामभाऊ राक्षे यांना अंनिसच्या जिल्हा कार्यकारिणीवर काम करण्याची संधी मिळाल्याने चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, नगरसेवक अ‍ॅड. प्रकाश गोरे, साधना गोरे, जयश्री नायकवाडी, अनिल लोहकरे, पुनम शेवकरी, मंगेश कांडगे, अनिता घोगरे, रणजीत जरे, रूपाली कांडगे, प्रेम जगताप, आरती परदेशी, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, उद्योजक किरण कौटकर, श्रीकांत जाधव आदींनी राक्षे यांचे जोरदार कौतुक केले.



### महिलांनी कुटुंब आणि स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या : डॉ. कल्याणी पुंडे

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील पारुंडे येथील महिलांनी एकत्र येत यांच्या डॉ. कल्याणी पुंडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला दिन उत्साहात साजरा केला. यावेळी डॉ.कल्याणी पुंडे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की,आपण कुटुंबाचा आधार व संस्कार आहोत.कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना धावपळीच्या युगात स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. आजार सांभाळत बसू नका. वेळेच्या वेळी संपूर्ण आरोग्याची तपासणी करून घ्या.महिलांमध्ये हिमोग्लोबिन व कॅल्शियमचे प्रमाण खूपच कमी होत आहे. स्वतः सक्षम असाल तरच कुटुंबाची जबाबदारी पेलू शकाल.आपल्याला हे सोनेरी दिवस ज्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,राजमाता जिजाऊ,अहिल्याबाई होळकर अशा अनेक मातांमुळे आलेले आहेत,त्यांना आपण कधीही विसरू शकणार नाही. या कार्यक्रमासाठी माजी सरपंच सविता जाधव, डॉ.कल्यानी पुंडे, मंगल तांबे, मंदाकिनी पवार,जरीना शेख,अर्चना पवार, मीना जाधव अशा महिलांसह मोठ्या संख्येने माता भगिनी उपस्थित होत्या.



### सिलेंडर मिळविण्यासाठी कडक उन्हात नागरिकांच्या लांबलचक रांगा

चाकण (दैनिक संध्या) : अमेरिका, इस्राइल व इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम देशांतर्गत असलेल्या गॅस पुरवठ्यावर होऊ लागला आहे. एजन्सीकडून घरपोच गॅस वितरण सेवा बंद केल्यामुळे ग्राहकांना कडक उन्हात रस्त्यावर लांबलचक रांगेत उभे राहून गॅस सिलिंडरची प्रतीक्षा करावी लागत आहे. चाकण व परिसरात गॅस सिलिंडर ८५५ रुपयांना मिळत होता. मात्र सध्या सिलिंडरचा दर ९१६ रुपयांपर्यंत वाढल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच घरपोच वितरणासाठी पूर्वी ८५५ रुपये घेतले जात होते. मात्र आता एजन्सी कडून सिलिंडर घेताना अतिरिक्त ६० रुपये आकारले जात असल्याचे ग्राहक सांगत आहेत. चाकण एमआयडीसी परिसरातील अनेक कामगारांना कामावर जाण्या - ऐवजी गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहावे लागत असल्याने त्यांची हजेरी बुडत आहे. उन्हात तासनतास उभे राहूनही सिलिंडर मिळेल की नाही याची खात्री नाही. एजन्सीकडून नियमित दिली जाणारी घरपोच गॅस वितरण सेवा सध्या बंद करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना स्वतः एजन्सीसमोर येऊन सिलिंडर घ्यावा लागत असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. परिणामी वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

# वाघोलीत १८ ते २२ मार्चदरम्यान ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

## विजेत्याला मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी



वाघोली (दै. संध्या)

महाराष्ट्रातील पारंपरिक आणि अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे ६८ वे अधिवेशन यंदा पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे रंगणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने ही स्पर्धा १८ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच इतक्या भव्य आणि दिव्य स्वरूपात आयोजन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेची सुरुवात स्व. कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून केली. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील कुस्तीपटूंनी मोठी कामगिरी करत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे हा त्यामागील मुख्य उद्देश होता. गेली ६७ वर्षे सातत्याने या स्पर्धेचे आयोजन होत असून यंदा ६८वे अधिवेशन पार पडत आहे.

रामकृष्ण सातव पाटील हे पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक असून त्यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य, वाघोली गावचे माजी उपसरपंच तसेच माजी पोलीस पाटील अशी विविध पदे भूषवली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली यंदाची महाराष्ट्र केसरी स्पर्धा भव्य आणि दिव्य स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी, बाजार मैदान, वाघोली (पुणे) येथे पार पडणार आहे. क्रीडा क्षेत्रातील स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून क्रीडानगरीला "स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी" असे नाव देण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन १८ मार्च रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. तर २२ मार्च रोजी समारोप व बक्षीस वितरण सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ दिली जाणारी महाराष्ट्र केसरीची मानाची गदा केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मा. पै. मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र केसरी विजेत्याला मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी उपमहाराष्ट्र केसरी विजेत्याला स्कॉर्पिओ गाडी तसेच माती व गादी विभागातील विविध वयोगटातील सुवर्णपदक विजेत्यांना एकूण १८ बुलेट मोटारसायकली रौप्यपदक विजेत्यांना स्प्लेंडर मोटारसायकल देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी मातीचे दोन आणि मॅटचे दोन असे एकूण चार आखाडे उभारण्यात येणार आहेत. मातीच्या आखाड्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा कुस्ती संघांकडून माती आणून विशेष आखाडा तयार करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाशी संलग्न असलेल्या राज्यातील ४२ जिल्हा कुस्ती संघांमधून सुमारे १५०० मल्ल या स्पर्धेत सहभागी होत आहेत. राज्यातील अनेक नामांकित तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेले कुस्तीपटू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

प्रेक्षकांसाठी ३५ ते ४० हजार क्षमतेचे भव्य स्टेडियम उभारण्यात येत आहे. तसेच वाहनांसाठी मोठ्या प्रमाणावर पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. सातव हायस्कूल, मोझे कॉलेज पार्किंग, बाजारतळ (VIP), केसनंद फाटा बसस्टॉप समोर, आव्हाळवाडी रोड - मुकेश सातव प्लॉट, तुकाराम सातव प्लॉट, जोशी पार्किंग आणि अनिल सातव प्लॉट येथे पार्किंगची सोय उपलब्ध असेल. स्पर्धेदरम्यान पंच, मल्ल व प्रशिक्षकांसाठी सुरक्षा, आरोग्य, निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. सहभागी मल्लांना ट्रॅक सूट, जिम बॅग आणि खुराक देण्यात येणार आहे. तसेच कुस्तीप्रेमींना स्पर्धा पाहता यावी यासाठी लाईव्ह टेलिकास्टची व्यवस्था करण्यात आली आहे. क्रीडानगरीच्या परिसरात पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सुविधा देखील उपलब्ध असेल. तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेदरम्यान विशेष उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. उत्कृष्ट ५ रिल्स तयार करणाऱ्यास आयफोन उत्कृष्ट फोटोग्राफी करणाऱ्यास कॅमेरा लेन्स उत्कृष्ट रॅप सॉंग करणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस

या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाराष्ट्र केसरी विजेत्याला दिल्या जाणाऱ्या मानाच्या गदेचे पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्रातील सर्व कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मानाच्या आणि ऐतिहासिक स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी केले आहे.

## पुणे-नगर रस्त्यावर एसटी बसच्या धडकेत दूचाकीस्वार तरूणाचा मृत्यु

शिरूर (दै. संध्या)

शहरातून जाणाऱ्या पुणे - नगर रस्त्यावर एसटी बसच्या धडकेत दूचाकीस्वार तरूणाचा मृत्यु झाला. शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास नगर परिषद कार्यालयाजवळ वाडा कॉलनी येथे ही दूर्घटना घडली. चंद्रकांत जयसिंग भोसले (वय-२६, रा. न्हावरे, ता. शिरूर, जि. पुणे) असे या अपघातात मृत्युमूखी पडलेल्या तरूणाचे नाव असून, तो वास्तुविषारद होता. पोलिस व स्थानिकांनी दिलेल्या माहितीनूसार, तो आपल्या दूचाकीवरून (क्र. एमएच १२ एक्सजे १५५५) आपल्या कामानिमीत्त शिरूरला आला होता. येथील काम उरकून सायंकाळी पाच च्या सुमारास परत न्हावरे येथे घरी जाण्यास निघाला. नगर परिषद कार्यालयामागील मतिमंद मुलींच्या शाळेसमोरून जाणाऱ्या रस्त्याने मुख्य रस्त्यावर येत असतानाच पुण्याहून शिरूरच्या दिशेने जाणाऱ्या पुणे - कन्नड या बसची (क्र. एमएच १४ एमएच ८९३५) त्याच्या दूचाकीला धडक बसली. बसच्या धडकेत फरफटत गेल्याने डोक्याला व चेहऱ्याला गंभीर मार लागला. जखमी अवस्थेतील चंद्रकांत याला बसचालकाने स्थानिकांच्या मदतीने सरकारी दवाखान्यात नेले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यु झाला. अपघातानंतर घटनास्थळी बस रस्त्यातच उभी असल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. सहायक पोलिस निरीक्षक दीपक करांडे, वाहतूक विभागातील पोलिस राजू वाघमोडे, शेखर झाडबुके आदींनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

## वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीम संस्थेचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा

नारायणगाव (दै. संध्या)



निसर्ग, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षणाच्या पवित्र उद्दिष्टाने कार्यरत असलेल्या वन्यजीव निसर्ग. संवर्धन रेस्क्यू टीम संस्था, जुन्नर यांचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात व दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाला पुणे जिल्ह्यातील विविध भागांतून वन्यजीव संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या संस्था, सर्पमित्र, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमाच्या मुख्य उपस्थितीमध्ये सर्पदंश तज्ञ डॉ. सदानंद राऊत, माजी सैनिक मेजर रमेश खरमाळे, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा शेख, वर्ड फोर नेचर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शुभम पांडे सर, तसेच जुन्नर वनविभागाचे वनपाल गणेश बागडे, वनपाल अनिल सोनवणे, वनरक्षक विशाल गुंड आणि वनरक्षक कैलास भालेराव हे मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वन्यजीव संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांचे कौतुक करत अशा संस्थांचे कार्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीम संस्था, जुन्नर चे अध्यक्ष आकाश माळी, उपाध्यक्ष दीपक माळी, सचिव हेमंत गाडगे, खजिनदार सतीश घाडगे, उपकार्याध्यक्ष सुरेश गायकवाड, सल्लागार आदित्य हांडे, ऋषी वावळ आणि प्रज्ञेश काशीकेदार यांसह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमादरम्यान वन्यजीव संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध संस्था व कार्यकर्त्यांना "वन्यजीव निसर्ग रक्षक पुरस्कार" प्रदान करून त्यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे वन्यजीव संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना नवीन प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनीलजी डोंगरे यांनी करत संस्थेच्या कार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली. त्यांनी संस्थेने गेल्या वर्षभरात केलेल्या वन्यजीव रेस्क्यू, जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

या कार्यक्रमामुळे जुन्नर परिसरात वन्यजीव संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली असून भविष्यातही संस्था अशाच प्रकारे समाजासाठी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी कार्यरत राहणार असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## वारूळवाडी येथे श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

नारायणगाव (दै. संध्या)





वारूळवाडी येथील वेताळबा देवस्थान ट्रस्ट, संत शिरोमणी सावता महाराज सेवा मंडळ, संचलित संत शिरोमणी सावता महाराज विठ्ठल रुक्मिणी श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन शनिवार दि. 14 मार्च 2026 ते 16 मार्च 2026 रोजी संत शिरोमणी सावता महाराज मंदिर गणपती चौक वारूळवाडी ता.जुन्नर,जि. पुणे येथे करण्यात आले असल्याची माहिती वेताळबाबा देवस्थान ट्रस्ट यांनी दिली आहे. तीन दिवस आयोजित केलेल्या या धार्मिक कार्यक्रमांमध्ये शनिवार दि. 14 मार्च 2026 रोजी सकाळी 9 वाजता मांडव डहाळे, दुपारी 3 ते 5 वाजता मुक्ताईदेवी मंदिर नारायणगाव येथे अभिषेक, मूर्तिची ग्रामप्रदक्षिणा, मुक्ताईदेवी मंदिर नारायणगाव ते संत शिरोमणी सावता महाराज मंदिर मिरवणूक, सायंकाळी 5 ते रात्री 7 वाजता अभिषेक (जलादिवस ) धान्य वास(निद्राकलश स्थापना ), रात्री 8 वाजता महाप्रसाद देण्यात आला.तसेच रविवार दि.15 मार्च 2026 रोजी सकाळी 8 ते 5 वाजता अग्नीस्थापना मंडण स्थापना (पीठ स्थापना ) स्थापित देवता हवन (गणेशयाग ), सायंकाळी 5 ते 6.30 वाजता हरिपाठ, सायंकाळी 7 ते 9 वाजता ह. भ. प. कृष्णा महाराज कमानकर (निफाड भेडाळी )नाशिक यांचे हरीकीर्तन, रात्री 9 वाजता महाप्रसाद आणि सोमवार दि. 16 मार्च रोजी सकाळी 8 ते 9 वाजता अभिषेक, स्थापित देवता पूजन स्तवन विधी, सकाळी 9 वाजता मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, सकाळी 10 वाजता परमपूज्य अनंतघोष मौनी बाबाजी (श्री क्षेत्र नारायणगाव), श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वंशज ह.भ.प. रविकांत महाराज वसेकर (श्री क्षेत्र अरण ), परम पूज्य विकासानंदजी स्वामी महाराज आनंद आखाडा (त्रंबकेश्वर) नाशिक, विनोदानंदजी शास्त्री महाराज (भार्गवराम मंदिर )वळती यांच्या हस्ते कलशारोहन,सकाळी 11 वाजता क्षेत्र बलिदान व आरती,सकाळी 11 ते 1 वाजता ह. भ. प. रंगनाथ महाराज नाईकडे (सेवानिवृत्त आय. एफ. एस. मुख्य वनसंरक्षक ) नाशिक यांचे हरिकीर्तन,दुपारी 1 वाजता महाप्रसाद होणार आहे.

तरी या कार्यक्रमासाठी नारायणगाव, वारूळवाडी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

असे आवाहन वेताळबा देवस्थान ट्रस्ट,वारुळवाडी,संत शिरोमणी सावता महाराज सेवा मंडळ वारूळवाडी,नवशक्ती मित्र मंडळ,वारूळवाडी, श्री गणेश सहकार मित्र मंडळ, वारूळवाडी, झुंजार नवतरुण मित्र मंडळ,चिमणवाडी,भागेश्वर मित्र मंडळ, समस्थ ग्रामस्थ मंडळी वारूळवाडी, नारायणगाव यांनी केली आहे.

## स्वयंपाक चुलीवर; हॉटेल व्यवसाय 'गॅस'वर


बारामती (दै. संध्या)

युद्ध परिस्थितीमुळे गॅस पुरवठा साखळी अडचणीत आली आहे. याचा सर्वाधिक फटका शहरातील उद्योगांसह खाद्यपदार्थ व्यवसायालाही बसला आहे. शहरात व्यावसायिक वापराच्या सिलिंडरचा पुरवठा पूर्ण बंद आहे. त्यामुळे हॉटेल व्यवसायाच 'गॅस'वर आल्याची स्थिती आहे. अशा स्थितीतही व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी अनेक हॉटेलमालकांनी चूल आणि कोळशावरील शेगड्यांचा वापर सुरू केला आहे. अमेरिका- इस्राईल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने व्यावसायिक वापराच्या 'एलपीजी सिलिंडर' पुरवठ्यावर निर्बंध आणले. त्यामुळे काही दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने शहरातील अनेक मोठ्या हॉटेल व्यावसायिक हतबल झाले आहेत. त्यावर तोडगा म्हणून नागरिक आणि हॉटेल व्यावसायिकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करणे पसंत केले आहे. काही व्यावसायिकांनी हॉटेलमध्ये सिमेंटची चूल तयार केली आहे. काही ठिकाणी लोखंडी चुलीवर स्वयंपाक करण्यात येत आहे. यातून ग्राहक टिकवण्यासाठी हॉटेल व्यावसायिकांनी धडपड सुरू केली आहे. व्यावसायिक सिलिंडर मिळत नसल्याने हॉटेल बंद ठेवण्याची नामुष्की आली आहे. मात्र, हॉटेल व्यावसायिकांनी हार न मानता त्यातूनही शक्कल लढवली आहे. गॅस नसल्यावर हॉटेल बंद ठेवण्यापेक्षा चुलीचा पर्याय अनेकांनी स्वीकारला आहे. अनेक हॉटेलमध्ये अन्न शिजवण्यासाठी पहिल्यांदाच चूल पेटली आहे.

# आवड, ज्ञान व समाजाच्या गरजा लक्षात घेऊन करिअरची निवड करावी

विजय कचरे

जेजुरी (दै. संध्या)




श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जेजुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे या विद्यालयात संस्थेचे विशेष मार्गदर्शक आय.ए.एस अधिकारी डॉ. राजेंद्रजी जगताप साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. विजय कचरे व मा. प्रा. जयंत पाणबुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना स्वतःची आवड, क्षमता व समाजाच्या गरजा ओळखून निर्णय घ्यावा, असे मार्गदर्शन करण्यात आले. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य नियोजन आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

करिअर निवडताना विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचा विषय निवडावा. शिक्षणाबरोबर कौशल्य विकासावर भर देणे आवश्यक असून त्यासाठी स्वअभ्यास, विविध पुस्तके वाचन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

विज्ञान, कला व वाणिज्य या विविध शाखांमधील शिक्षणाच्या संधींबाबत माहिती देण्यात आली. विशेषतः वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी NEET परीक्षेसाठी फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, असेही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी, करिअरचे विविध पर्याय तसेच जीवनात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम व प्रामाणिकपणा यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी केले तर आभार सोमनाथ उबाळे यांनी मानले.कार्यक्रमाचे नियोजन पर्यवेक्षिका लीना पायगुडे,शाळा समन्वयक प्रल्हाद गिरमे, माध्यमिक विभागप्रमुख बाळासाहेब जगताप,सोनबा दुर्गाडे,किरण मोडक,योगेश घोरपडे,कैलास सोनवणे,जयसिंग वसावे,सुरेश शिंदे,पांडुरंग भांड,अमोल राणे,महेश खाडे, श्वेतांबर बेलसरे,संदीप भोंग, वैष्णवी पवार,अजय जगताप,राघू हारुळे, पूनम बाठे,शोभा शिंदे,सोनाली कोसे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीवर डॉ. धनंजय भिसे

चिंचवड (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या दि. ६ मार्च २०२६ रोजीच्या शासन आदेशानुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीच्या सदस्यपदी डॉ. धनाजी ऊर्फ धनंजय सोमनाथ भिसे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक श्री. हेमंत हरहरे यांनी चिंचवड येथे त्यांचा सत्कार करून मनःपूर्वक अभिनंदन केले. पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे. या समितीच्या माध्यमातून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, विचार आणि जीवनकार्य समाजापर्यंत अधिक व्यापक स्वरूपात पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे अण्णा भाऊ साठे यांच्या समृद्ध साहित्याचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे होऊन त्यांचे विचार आणि संघर्षमय जीवनकार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यास नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा श्री .हेमंत हरहरे यांनी व्यक्त केली. यावेळी पुढे बोलताना हेमंत हरहरे म्हणाले की, अण्णा भाऊ साठे हे खऱ्या अर्थाने राष्ट्रभक्त साहित्यिक होते. त्यांच्या लेखनातून समाजातील वंचित, शोषित आणि सामान्य माणसाच्या जीवनसंघर्षाचे जिवंत आणि वास्तव चित्र उभे राहते. सामाजिक जाणीव, मानवी मूल्ये आणि परिवर्तनाची प्रेरणा यांचा संगम त्यांच्या साहित्यामध्ये दिसून येतो. देव, धर्म आणि देशाबद्दल त्यांच्या लेखनात अति टोकाचा, अतिरेकी किंवा आक्षेपार्ह उल्लेख आढळत नाही. त्यामुळे त्यांच्या कार्याचा अभ्यास, संशोधन आणि प्रसार अधिक व्यापक प्रमाणात व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अर्थसंकल्पावरील घडी पुस्तिकेचे प्रकाशन

नागपूर (दैनिक संध्या) : माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर विभागीय माहिती संचालक कार्यालयाने महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी सादर अर्थसंकल्पामध्ये विदर्भासाठी करण्यात आलेल्या तरतुदींवर आधारित घडी पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. मुख्यमंत्री यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी आयोजित अनौपचारिक कार्यक्रमात हे प्रकाशन पार पडले. नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, सहायक संचालक पल्लवी धारव, माहिती अधिकारी रितेश भुयार, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रसिद्धी समन्वयक अविनाश महालक्ष्मे, रमाकांत दाणी, अनिल गडेकर यावेळी उपस्थित होते. अर्थसंकल्पात विदर्भातील कृषी, आरोग्य, उद्योग, शिक्षण, पायाभूत सुविधा आदींबाबत करण्यात आलेल्या तरतुदींची माहिती वैविध्यपूर्ण ग्राफिक्सद्वारे घडी पुस्तिकेत देण्यात आली आहेत. उत्तम रंगसंगती आणि मांडणीमुळे घडी पुस्तिका आकर्षक झाली आहे. विविध शासकीय कार्यालये आणि प्रसार माध्यमांसाठी ही घडी पुस्तिका संदर्भ म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

### भव्य राष्ट्रध्वज नागपूरच्या राष्ट्राभिमानाचे प्रतीक ठरेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर (दैनिक संध्या) : देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य स्वातंत्र्य सैनिकांनी प्राणांची आहुती दिली याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. याची सदैव जाण ठेवून नागपुरात उभारण्यात आलेला हा भव्य राष्ट्रध्वज येथील जनतेच्या राष्ट्राभिमानाचे प्रतीक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. येथील ऐतिहासिक कस्तुरचंद पार्कवर नागपूर महानगरपालिका आणि लोकमत वृत्तपत्र समूह यांनी साकारलेल्या २०० फूट उंच भारतीय राष्ट्रध्वजाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार संदीप जोशी आणि विकास ठाकरे, महापौर नीता ठाकरे, प्रभारी महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत आणि वैष्णवी बी, लोकमतच्या एडिटोरियल बोर्डचे चेअरमन डॉ. विजय दर्डा आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, परदेशात त्या – त्या देशांचे राष्ट्रध्वज उभारल्याचे दिसत होते. राष्ट्रभिमान जागविण्यासाठी भारततही राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत, अशी मागणी व्हायची मात्र, त्यास फ्लॅग कोडची अडचण येत असे. ती अडचण दूर झाल्याने देशात भव्य राष्ट्रध्वज उभारण्यात येत आहेत. नागपुरातील या ऐतिहासिक कस्तुरचंद पार्कवर उभारण्यात आलेला हा राष्ट्रध्वज प्रत्येक नागपूरकराचा राष्ट्रभिमान जागविणारा असा आहे. याचे उत्तम आरेखन करण्यात आले आहे. नागपुरातून अन्य राज्याकडे जाणाऱ्या शहरांचे शहरांचे प्रतीकही येथील भिंतींवर दिसून येत आहेत. या शहरात असा भव्य राष्ट्रध्वज उभारण्यात आला ते अभिमानास्पद आहे. हा राष्ट्रध्वज बघून देशाभिमाने उर भरून येतो, असेही त्यांनी सांगितले. लोकमत वृत्तपत्र समूहाने हा राष्ट्रध्वज उभारण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी कौतुक केले. डॉ. विजय दर्डा यांनी स्वागत पर भाषण केले. तत्पूर्वी, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते येथील कोनशिलेचे अनावरण झाले. त्यांनी राष्ट्रध्वजवंदन व राष्ट्रध्वजाचे अनावरण केले. २००९ मध्ये कस्तुरचंद पार्क येथे राष्ट्रध्वज उभारण्याची संकल्पना मांडण्यात आली. 2016 मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. या राष्ट्रध्वजाचे वास्तूविशारद शांतनू भाल्ला आहेत.

### महाराष्ट्र शासनाचे चार, 15, 21, 26 वर्षे मुदतीचे रोखे विक्रीस

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या चार वर्षे मुदतीच्या 1500 कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तीच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकाने दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. 17 मार्च 2026 रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल.

# वीजबिल भरा, पाडवा गोड करा

## आपले वीजबिल थकबाकीसह आजच भरा : पुणे परिमंडलात ३१९ कोटींची थकबाकी; ७१२२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

पुणे (दै. संध्या)

| क्र. | मंडल | थकबाकीदार ग्राहकांची संख्या | थकबाकी रक्कम ( रु.) |
|---|---|---|---|
| १ | गणेशखिंड मंडल | १६९७२९ | ४४ कोटी २३ लाख |
| २ | पुणे ग्रामीण मंडल | १८३७३२ | २३१ कोटी ६ लाख |
| ३ | रास्तापेठ मंडल | १९८१३७ | ४४ कोटी २० लाख |
| | पुणे परिमंडल एकूण | ५५१५९८ | ३१९ कोटी ५० लाख |

वारंवार पाठपुरावा करुनही वीजबिल भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध महावितरणने आक्रमक पवित्रा घेतला आहे. एकीकडे मार्च महिन्यात गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी आदी सणवार आहेत. तर दुसरीकडे महावितरणची मार्च एण्ड मोहीम या परिस्थितीत वीजग्राहकांनी आपले वीजबिल थकबाकीसह भरुन गुढीपाडवा गोड करावा, वाद टाळून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन पुणे परिमंडलाकडून करण्यात आले आहे. पुणे परिमंडलात ३१९ कोटी ५० लाख रुपयांच्या थकबाकी वसुलीसाठी धडक मोहीम राबवण्यात येत असून, १ मार्चपासून ७१२२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केलेला आहे. मार्च अखेर थकबाकी शून्य करण्यासाठी महावितरणने थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यास सुरुवात केली आहे. वसुलीसाठी महावितरणने विभागनिहाय पथके तयार करुन थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याची प्रक्रिया वेगवान केली आहे. थकबाकीसाठी वीजपुरवठा नाईलाजाने खंडित करावा लागत आहे. त्यातून अनेक ठिकाणी वादावादीचे प्रसंग उद्भवत आहे. तसेच वीजपुरवठा खंडित केल्यास पुनर्रजोडणी शुल्काचा भुर्दंड ग्राहकांना बसणार आहे.

पुणे परिमंडलात ५ लाख ५१ हजार ५९८ ग्राहकांकडे तब्बल ३१९ कोटी ५० लाख रुपयांची थकबाकी आहे. वर्गवारीनिहाय थकबाकीचा विचार केल्यास घरगुती ४,६४,३०२ ग्राहकांकडे ७४ कोटी ८१ लाख, वाणिज्यिक ६५,४०८ ग्राहकांकडे ३१ कोटी ५३ लाख, औद्योगिक १०,०९९ ग्राहक १८ कोटी ३६ लाख, दिवाबत्ती ४,६१० ग्राहक ९६ कोटी १४ लाख, सार्वजनिक पाणीपुरवठा १,८५८ ग्राहक ८७ कोटी ५० लाख तर सार्वजनिक सेवा व इतर वर्गवारीतील ५,३२१ ग्राहकांकडे ११ कोटी १३ लाख रुपये इतकी थकबाकी आहे.

१ मार्च ते ९ मार्च २०२६ या कालावधीत ७ हजार १२२ ग्राहकांचा वीज पुरवठा आधीच खंडित करण्यात आला आहे. यामध्ये १ हजार ७२५ कायमस्वरूपी तर ५ हजार ३९७ तात्पुरत्या स्वरूपातील खंडित जोडण्यांचा समावेश आहे.

फायर ब्रिगेड उपविभागांतर्गत वसुलीसाठी गेलेले शाखा अभियंता अनिरुद्ध लिमकर यांना निलेश म्हेत्रे या ग्राहकाने मीटरची तपासणी करताना शिवीगाळ करत धमकावले होते. त्यामुळे लिमकर यांनी खडक पोलिस ठाण्यात तशी फिर्याद दिली. तर दुसऱ्या घटनेत कोंढवा बु. येथे वसुलीसाठी गेलेले वरिष्ठ तंत्रज्ञ गणेश कसबे यांना तिथे उपस्थित असलेल्या अहमद मोहमद हनिफ शेख याने शिवीगाळ करुन धमकावले. या प्रकरणातही महावितरणने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

ऑनलाईन वीजबिल भरल्यास जवळपास १ टक्का आणि तत्काळ बिल भरल्यास तत्पर देयक भरणा सूट मिळते. याउलट, बिल भरण्यास विलंब केल्यास दंड लागतो. त्यामुळे ग्राहकांनी आर्थिक नुकसान टाळण्यासाठी मुदतीपूर्वी बिलाचा भरणा ऑनलाईन करणे फायदेशीर ठरते. महावितरण मोबाईल ॲप, www. mahadiscom.in संकेतस्थळ, फोन पे, गुगल पे, भीम आदी युपीआय ॲपचा वापर करुनही वीजबिल घरबसल्या भरता येते.

### वीजग्राहकांनी गैरसोय टाळावी- सुनिल काकडे

ग्राहकांनी चालू वीज देयकासह थकबाकीचा त्वरित भरणा करून महावितरणला सहकार्य करावे. वीज पुरवठा खंडित करण्याचा प्रसंग टाळावा. तसेच वीजबिल भरण्यासाठी डिजिटल पेमेंटचा वापर करावा असे आवाहन महावितरण पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी केले आहे.

## महाराष्ट्र शासनाचे २१ वर्षे मुदतीचे १००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या २१ वर्षे मुदतीच्या १००० कोटींच्या ७.६६ % महाराष्ट्र शासनाचे रोखे,२०४७ च्या (दि.४ मार्च २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तीच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकाने दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. 17 मार्च 2026 रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् 17 मार्च 2026 रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

मुंबई (दै. संध्या)

केंद्र सरकारतर्फे ग्राहकांना मिळणाऱ्या अनुदानात राज्य सरकारतर्फे आणखी भर घालून राज्यातील दारिद्र्य रेषेखालील आणि महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असलेल्या गरीब गटातील एकूण पाच लाख वीज ग्राहकांसाठी स्मार्ट योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या निविदेत प्रती किलोवॅट केवळ ४५,४९५ रुपये इतका खर्च निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या ग्राहकांना खूपच कमी लाभार्थी हिस्सा भरून मोफत वीज मिळविता येणार आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची अंमलबजावणी करताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी १ लाख ८ हजार घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.महिना तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे व अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ही योजना सुरू केली आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या थेट उपयोगाच्या या योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. केंद्र सरकारने गेल्या पाच महिन्यांतील योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी किती अर्जदारांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले, याचा विचार करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र १ लाख ८ हजार ३२७ स्थापित सौरऊर्जा प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५), गुजरात (९४ हजार ३६४), राजस्थान (३९ हजार ४८४) व केरळ (३६ हजार ८३६) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकावर आहेत. देशामध्ये या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी एकूण ५ लाख ५७ हजार २२४ घरगुती ग्राहकांकडे सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले. त्यापैकी १९ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात बसविण्यात आले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती ग्राहकांना छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान थेट दिले जाते. ऊर्वरित रक्कम लाभार्थी वीजग्राहकाने भरायची असते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्माण होते. छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पातून ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यामुळे त्याचे बिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज विकून त्याला उत्पन्नही मिळते. एकदा सौरऊर्जा प्रकल्प बसविला की त्यातून २५ वर्षे वीजनिर्मिती होते.

## अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठात “उत्कर्ष “राष्ट्रीय परिषद संपन्न



चऱ्होली (दै. संध्या)

अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठातील डॉ. डी. वाय. पाटील स्कूल ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने उत्कर्ष “अत्याधुनिक संशोधन आणि नवोपक्रम” या विषयावर आधारित, दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषदेला उत्सफुर्त प्रतिसाद मिळाला . सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहयोगाने घेण्यात आली.

‘अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठा’चे अध्यक्ष, डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील उपाध्यक्ष तथा ‘डी. वाय. पाटील स्कूल ऑफ मॅनेजमेंट’ चे संचालक, प्रा. (डॉ.) एकनाथ बी. खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद संपन्न झाली.

उद्घाटन प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, डॉ. पराग काळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे (छत्रपती संभाजीनगर) प्र-कुलगुरू, प्रा. (डॉ.) वाल्मिक सरवदे आणि ‘लँगबस्टेक युनिव्हर्सिटी इंक., न्यू जर्सी, अमेरिका’ चे अध्यक्ष व कुलपती, प्रा. (डॉ.) रिपू रंजन सिन्हा आदी ममयवर उपस्थित होते. या परिषदेत

डॉ. पराग काळकर म्हणाले कि, डिजिटल युगातील संशोधन आणि नाविन्यपूर्णतेच्या (इनोव्हेशनच्या) अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेवर भर दिला. संशोधनाने नेहमीच व्यवहारिक उपयुक्ततेचे ध्येय बाळगले पाहिजे, डिजिटल युगातील संशोधनाने आता अधिकाधिक व्यावहारिक आणि प्रत्यक्ष जगाशी संबंधित उपयोगांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे; जेणेकरून सामाजिक, औद्योगिक आणि तांत्रिक आव्हानांवर थेट उपाय शोधता येतील, केवळ सैद्धांतिक चौकटींपुरते मर्यादित न राहता, समकालीन संशोधनाने अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्यासाठी 'डेटा-आधारित अंतर्दृष्टी' , डिजिटल साधने आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील पडताळणी यांचा आपल्या कार्यात समावेश केला पाहिजे.

डॉ वाल्मिक सरवदे म्हणाले कि,विद्यापीठे आणि उद्योगांमधील मजबूत भागीदारी नवोपक्रमाला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते, अशा सहकार्यांमुळे शेवटी रोजगाराच्या चांगल्या संधी निर्माण होतात, कारण विद्यार्थ्यांना वास्तविक जगातील आव्हाने आणि उद्योगाशी संबंधित कौशल्ये अनुभवायला मिळतात.

प्रा. (डॉ.) एकनाथ खेडकर यानी स्वागत केले व म्हणाले कि, डिजिटल युगात नवोपक्रम-चालित संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी जलद तांत्रिक प्रगती विविध क्षेत्रांमध्ये कशी परिवर्तन घडवत आहे यावर प्रकाश टाकला आणि आजच्या डिजिटल जगात उदयोन्मुख आव्हाने आणि संधींना तोंड देण्यासाठी संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञांनी सर्जनशील, दूरगामी विचारसरणीचा दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज असल्याचे सांगितले.

## महाराष्ट्र शासनाचे १५ वर्षे मुदतीचे २००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस


मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या 15 वर्षे मुदतीच्या 2000 कोटींच्या 7.43 % महाराष्ट्र शासनाचे रोखे,२०४० च्या (दि.३ डिसेंबर २०२५ रोजी उभारलेल्या ) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तीच्या अधीन राहून करण्यात येईल. राज्य शासनास ५००.०० कोटी पर्यंत अतिरिक्त रक्कम उभारण्याचा पर्याय उपल्ध असेल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकाने दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. 17 मार्च 2026 रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् 17 मार्च 2026 रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल.

## अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचा नवी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय परिषदेत गौरव

### ऊर्जा क्षेत्रातील योगदानासाठी ‘वूमन इन एनर्जी ॲन्ड युटिलिटीज’ पुरस्कार

मुंबई (दै. संध्या)



विद्युत क्षेत्रातील नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांना ‘वुमन इन एनर्जी ॲण्ड युटिलिटीज’ पुरस्कार जाहीर झाला. त्यांच्यावतीने महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. दत्तात्रेय पडळकर व मुख्य महाव्यवस्थापक (आयटी) श्री. अविनाश हावरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रामध्ये आमूलाग्र व पर्यावरणपुरक बदल घडवून आणल्याच्या कामगिरीची दखल घेत अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना ‘वुमन इन एनर्जी ॲन्ड युटिलिटीज’ या पुरस्काराने गौरविण्यात आले. 'इंडिया स्मार्ट युटिलिटी विक २०२६' या आंतरराष्ट्रीय परिषदेत शुक्रवारी (दि. १३) त्यांचा सन्मान करण्यात आला.

इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या वतीने नवी दिल्ली येथे स्मार्ट इंडिया युटिलिटी विक-२०२६ अंतर्गत १२ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत जगभरातील वीजतज्ज्ञ सहभागी झाले असून प्रामुख्याने विद्युत क्षेत्रातील आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञान, सौर ऊर्जा, हायटेक ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन, ऊर्जा साठवण, पर्यावरण आदींवर सादरीकरण व चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. यातील ऊर्जा परिवर्तनाद्वारे राज्याच्या विद्युत क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा सुरु आहेत. सर्व वर्गवारीतील ग्राहकांना मुबलक, स्वस्त व शाश्वत वीजपुरवठा उपलब्ध होत आहे. तसेच विविध योजनांच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक प्रगतीला वेग मिळाला आहे.

रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅनमध्ये हरित ऊर्जेवर अधिक भर देण्यात आला आहे. सन २०३० पर्यंत विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. सोबतच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून सुमारे ७ लाखांवर रोजगार निर्माण होत आहेत. नियोजनानुसार पुढील पाच वर्षांत वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी सन २०३० पर्यंत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होण्यास सुरवात झाली आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत.

शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांची ‘मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०’ सुरु करण्यात आली.

या योजनेतून १० लाख ९५ हजार आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून ८ लाख ६५ हजार अशा एकूण १९ लाख ६५ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. देशात अग्रेसर ठरलेल्या या दोन्ही योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## 'श्री छत्रपती शिवराय स्वरवंदनेतून' शिवरायांना संगीतमय अभिवादन

■ स्वच्छंद पुणे यांच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन

■ गायक रविंद्र शाळू, पल्लवी आनदेव यांचे सादरीकरण

पुणे (दैनिक संध्या) : 'हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा...', 'शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती...', 'मराठी पाऊल पडते पुढे...', 'जय देव जय देव जय शिवराया...' अशी छत्रपती शिवाजी महाराज यांची महती सांगणारी गीते सादर करून शिवरायांना अभिवादन करण्यात आले. या गीतांमधून शिवरायांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याच्या आदर्शाची आठवण करून देत वातावरण शिवमय झाले. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वोच्च स्थानी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांना कलाकारांनी संगीतमय अभिवादन केले. स्वच्छंद पुणे यांच्यावतीने 'श्री छत्रपती शिवराय स्वरवंदना' या कार्यक्रमाचे आयोजन बालगंधर्व रंग मंदिरात करण्यात आले होते. यावेळी नगरसेविका ज्योत्स्ना कुलकर्णी, भाजपचे ज्येष्ठ नेते जगन्नाथ कुलकर्णी, शिक्षणतज्ञ डॉ. ए. पी. कुलकर्णी, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. दत्तात्रेय तापकीर यावेळी उपस्थित होते. गायक रविंद्र शाळू, पल्लवी आनदेव यांनी कार्यक्रमात सादरीकरण केले. त्यांना सहगायक म्हणून अनिल जोशी, तुषार साधले, मिलिंद दामले, मंदार मुंडले, धनंजय इंगळे, कैलास देसले, मंगेश कुलकर्णी यांनी साथ दिली. तुषार दीक्षित (कीबोर्ड), अक्षय पाटणकर (तबला), केदार तळणीकर (तबला/ ढोलकी), नरेंद्र काळे (तालवाद्य) यांनी साथ संगत केली. शिवचरित्रकार प्रसाद तारे यांनी निवेदन केले. गायक रविंद्र शाळू आणि कलाकारांनी सादर केलेल्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर 'गुणीबाळ असा', शूर आम्ही सरदार, शतकांच्या यज्ञातून अशी एकाहून एक सरस गीते सादर करण्यात आली. 'वेडात मराठी वीर दौडले सात' या पल्लवी आनदेव यांनी सादर केलेल्या गीताला रसिकांनी विशेष दाद दिली. प्रियांका भिडे आणि सहकाऱ्यांनी सादर केलेल्या 'कुंद कहा पय वृंद कहा' आणि 'इंद्र जिमी जंभ पर' या नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात रंग भरले. शेवटी 'जय देव जय देव जय जय शिवराया' या आरतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




## मधमाशांच्या पोळामुळे बनेश्वर भक्तांना त्रास; ट्रस्टची वनविभागाकडे तक्रार

नसरापूर (दैनिक संध्या) : श्री बनेश्वर महादेव देवस्थान ट्रस्टने वनविभागाकडे मधमाशांच्या पोळांमुळे होणाऱ्या त्रासाबाबत तक्रार नोंदवली आहे. बनेश्वर क्षेत्रातील पार्किंग भागातील झाडांवर मधमाश्यांची मोठे पोळ तयार झाले असून, यामुळे भाविक आणि नागरिकांना चावण्याचा धोका वाढला आहे. ट्रस्टने नसरापूर येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना पत्र लिहून त्वरित उपाय करण्याची विनंती केली आहे. ट्रस्टकडून पाठवलेल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, श्री क्षेत्र बनेश्वर परिसरातील पार्किंगमधील झाडांवर असंख्य मधमाशांचे पोळ झाले आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या नागरिक आणि भाविकांना मधमाशा चावत असल्याने त्यांना नाहक त्रास होत आहे. 'कोणत्याही प्रकारची गंभीर घटना घडू नये यासाठी त्वरित उपाय करण्यात यावेत,' अशी स्पष्ट विनंती ट्रस्टने केली आहे. पत्राची प्रत नसरापूर येथील वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष देण्यात आली आहे. बनेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यासाठी दररोज अनेक भाविक येतात. पार्किंग भागातच मधमाश्यांची पोळ असल्याने वाहने उभी करणे धोकादायक झाले आहे. स्थानिक रहिवासी कैलास यांनी सांगितले, 'झाडाखाली उभे राहिल्यावर मधमाशा हल्ला करतात. लहान मुले आणि वृद्ध भाविकांना विशेष धोका आहे. वनविभागाने योग्य पावले उचलली पाहिजेत.' अशीच खंत अनेकांनी व्यक्त केली आहे. मधमाशी संरक्षित प्राणी असल्याने त्यांचे पोळ काढणे कायद्याने बंधनकारक आहे. वनविभागाकडून विशेष तज्ज्ञ मधमाश्यांना सुरक्षितरित्या हलविण्याचे काम केले जाते. ट्रस्टने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्याने लवकरच पाहणी करून आणि उपाययोजना होईल, अशी अपेक्षा आहे. यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारींवर वनविभागाने तातडीने कारवाई केली आहे. ट्रस्टकडून घेतलेल्या या पुढाकारामुळे स्थानिक भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. भोर तालुक्यातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळावी यासाठी अशा समस्या तत्काळ सोडवाव्यात, अशी मागणी होत आहे.



## गॅस टंचाईमुळे मातीच्या चुलींना पुन्हा मागणी; घोडेगावातील कारागिरांना कामाला उभारी

घोडेगाव (दैनिक संध्या) : गॅस टंचाई वाढल्याने ग्रामीण भागात पुन्हा मातीच्या चुलींना मागणी वाढली असून घोडेगाव येथे चुली बनविणाऱ्या कारागिरांच्या कामाला सध्या चांगलीच उभारी मिळाली आहे. पारंपरिक पद्धतीने माती व शेणापासून बनविल्या जाणाऱ्या चुलींसाठी ग्राहकांकडून मोठी मागणी होत आहे. सध्या दोन ठिकाणांहून जाळ निघणारी अवलाची चूल सुमारे ३०० रुपयांना, तर एकाच ठिकाणाहून जाळ निघणारी सडीची चूल सुमारे २०० रुपयांना उपलब्ध आहे. याशिवाय गॅस शेगडीवर ठेवता येणाऱ्या चुली व तंदूरही येथे तयार केले जात आहेत. घोडेगावमध्ये आजही कोणतीही यंत्रसामग्री न वापरता पूर्णपणे हाताने मातीच्या चुली तयार केल्या जातात. अनेकांना आजही चुलीवरच्या भाकरीची चव आवडत असल्याने घरात गॅस असला तरी ग्रामीण भागातील लोक चुली घेऊन जातात. तसेच गॅस टंचाईमुळे चुलींची मागणी वाढल्याने चुली बनविण्याचे कामही वाढले असल्याचे कारागीर सुधाकर सोमवंशी यांनी सांगितले.

# संकुचित राजकारणासाठी सावरकरांचा माफिवीर म्हणून उल्लेख

## सावरकरांच्या त्यागाचा सन्मान करावा : माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे मत

पुणे (दै. संध्या)




स्वतःच्या संकुचित स्वार्थाच्या राजकारणा पोटी ज्यांना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कष्टांचे आणि त्यागाचे काही घेणेदेणे नाही, तेच लोक खुनशीपणाने सावरकरांचा उल्लेख "माफीवीर" म्हणून करतात. जे त्यांना माफीवीर म्हणतात, त्यांना सावरकरांच्या त्यागाचा सन्मान करावासा वाटत नाही. माफीची तथाकथित पत्रे ही एक स्ट्रॅटेजी आहे. जर सावरकरांचा विरोध करायचा असेल, तर तो शालीनतेने करावा; त्यांच्या त्यागाचा सन्मान करावा, असे मत माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. स्वानंद चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने आयोजित, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांच्या सहकार्याने 'मी सावरकर' या अभिनव वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा फर्ग्युसन महाविद्यालय च्या अँफिथिएटरमध्ये संपन्न झाला. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी, संयोजन समिती अध्यक्ष धनंजय बर्वे, सी.ए. रणजीत नातू, प्रवीण गोखले, अमेय कुंटे, शैलेश काळकर, रवींद्र ढवळीकर, वर्षा ओक उपस्थित होते.

नाट्यवाचन स्पर्धेत दीपक दत्ता, प्रिया राजपूरकर-करे; वक्तृत्व स्पर्धेच्या वरिष्ठ गटात मेधा लोवलेकर; व्यावसायिक गटात संतोष कानडे; दुसरा आणि तिसरा गटात अनुक्रमे प्राजक्ता शेलवले, मोनिका; युवा गटात वैष्णवी परकाळे; ज्येष्ठ गटात कमलेश रामचंद्र मराठे; पहिला गटात आरुष घेरडे; संगीतमय गटात ऋचा महामुनी हे विजेते ठरले. कमलेश मराठे यांनी महाविजेतेपद पटकावले.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा स्पर्श ज्यांना होतो, त्यांचे जीवन उजळून निघायला सुरुवात होते. त्यांना माफीवीर म्हणणे म्हणजे निखालस खुनशीपणा आहे. यात जराही तथ्य नाही. भारताची थोरवी कशी वाढवायची हे आपल्या सगळ्यांसमोरचे महत्त्वाचे काम आहे. आपले कर्तृत्व भारतमातेसाठी अर्पण कसे करायचे हे ज्याला कळले, त्याला भारतमाता आणि सावरकर कळले, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मंजुषा नागपुरे म्हणाल्या, 'मी सावरकर' स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा जागरण सोहळा आहे. सावरकर हे एक नाव नसून विचार आहे. ते केवळ कवी किंवा वक्ते नाहीत, तर क्रांतिकारक आणि शब्दाला कृतीची जोड देणारे महापुरुष आहेत. सावरकरांनी सांगितलेला विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन अंगीकारणे हीच त्यांना श्रद्धांजली आहे. आपल्या कृतीत सावरकरांची राष्ट्रनिष्ठा कायम राहू द्या, असेही त्यांनी सांगितले.

अशोक पलांडे म्हणाले, 'मी सावरकर' ही स्पर्धा नसून सावरकरांचे विचार पोहोचविण्याचे माध्यम आहे. समाजात वेगवेगळ्या विचारधारा निर्माण होत आहेत. सावरकरांचे विचार आत्मसात करावेत, हीच त्यांना श्रद्धांजली आहे. राष्ट्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असेही त्यांनी सांगितले.

## पहाटे गोळीबार; जमिनीच्या वादातून प्रकार, नागरिकांमध्ये खळबळ

केडगाव (दै. संध्या)

केडगाव (ता. दौंड) : केडगाव स्टेशन परिसरात शनिवारी पहाटेच्या सुमारास गोळीबाराची घटना घडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. मध्यवस्तीतील या घटनेमुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्राथमिक माहितीनुसार जमिनीच्या वादातून हा प्रकार घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. केडगाव पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर वागज यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे शहरातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या एका व्यक्तीने हवेत गोळीबार केल्याची चर्चा परिसरात आहे. पहाटेच्या शांततेत अचानक गोळीबाराचे आवाज ऐकू आल्याने परिसरातील नागरिक दचकले आणि अनेक जण घराबाहेर येऊन काय घडले याची माहिती घेऊ लागले. लोकवस्तीच्या भागातच हा प्रकार घडल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच यवत पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. संबंधित व्यक्तींची माहिती गोळा करण्याचे काम सुरू असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

दरम्यान, लोकवस्तीमध्ये अशा प्रकारे गोळीबार झाल्यामुळे नागरिकांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. या घटनेचा सखोल तपास करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## ॲड. संजय सावंत यांची कायदेशीर सल्लागार पदी निवड

पुणे (दै. संध्या)



पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, म्हाडा करीता महाराष्ट्रातील अनेक अनुभवी वकील यांच्याकडून जिल्हा व सत्र न्यायालय, इतर न्यायालय, जिल्हा व राज्य कंज्यूमर न्यायालय, सहकार न्यायालय, महसूल न्यायालय, प्रशासकीय न्यायाधिकरण न्यायालय, इतर कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, प्राधिकरण संदर्भातील दावे चालविण्याकरिता जुलै आणि ऑगस्ट 2025 दरम्यान वकील पॅनल करीता जाहिरातीद्वारे निवेदन अर्ज मागविण्यात आलेले होते. यानंतर नोव्हेंबर 2025 मध्ये मुलाखती घेण्यात आलेल्या होत्या. त्यासंदर्भात नुकताच म्हाडा कडून निर्णय घेण्यात आला यामध्ये अँड. संजय दत्तात्रय सावंत यांची म्हाडा (MHADA) पुणे वकील पॅनल वर निवड करण्यात आली.

अँड संजय सावंत पाटील यांनी हे सध्या महावितरण, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित (पी.डी.सी.सी बँक), पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जगदंब सामाजिक प्रतिष्ठान, येसूबाई सामाजिक प्रतिष्ठान यावर कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

शासकीय, निमशासकीय, कंपनी, राजकीय, सामाजिक अनेक संस्था, तसेच वकिली व्यवसायातील सर्व प्रकारच्या कामाच्या अनुभवाची दखल घेऊन म्हाडाच्या सर्व वरिष्ठ अधिकारी साहेब यांनी मिळून अँड. संजय सावंत (पाटील) यांना गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे म्हाडा करीता कायदा (विधी) विभाग मध्ये वकील पॅनेल वरती कायदेशीर सल्लागार म्हणून निवड केलेली आहे. यासंदर्भात पुणे विभागाचे चिप ऑफिसर यांच्या अधिकृत स्वाक्षरीने पत्र देण्यात आलेले आहे. सदरील पत्र पुणे विभागाचे लिगल अँडव्हायजर अधिकारी असलेले मा. डॉ. तुषार जाधव साहेब यांच्या मार्फत आधिकृत पत्र देण्यात आलेले आहे, तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी म्हाडाचे सर्व अधिकारी, तसेच आधी मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

म्हाडाच्या पॅनल अँडव्होकेट म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अँड. संजय दत्तात्रय सावंत (पाटील) यांनी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ म्हाडाचे अध्यक्ष माजी खासदार मा. श्री. शिवाजीदादा आढळराव पाटील साहेब, पुणे विभागाचे चिप ऑफिसर, पुणे विभागाचे लिगल अँडव्हायजर अधिकारी असलेले मा. डॉ. तुषार जाधव साहेब आणि म्हाडा कार्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे विशेष जाहीर आभार व्यक्त केले.

## धामणीच्या खंडोबा मंदिरात गुढीपाडव्याला वासंतिक चंदनउटीचे आयोजन

मंचर (दै. संध्या)



फाल्गुन कृष्ण पक्षापासून (४ मार्च २०२६) अभ्यंगस्नान, ग्रहण करिदिन, आम्रकुसुमप्राशन व वसंतोत्सवाच्या प्रारंभानंतर उन्हाचा दाह वाढू लागला आहे. तीव्र उन्हामुळे सर्व जीवसृष्टी त्रस्त होत असल्याने आपल्या कुलदैवताला उष्णतेचा त्रास होऊ नये तसेच खंडेरायाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगाला शीतलता मिळावी यासाठी आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात गुढीपाडव्याच्या (१९ मार्च २०२६) दिवशी वासंतिक चंदनउटी सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यात मंदिरातील स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच खंडोबा, म्हाळसाई आणि बाणाई यांच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांना चंदनउटी लेपन करण्यात येणार आहे. या वासंतिक चंदनउटीसाठी लागणारे सुवासिक चंदन सहाणेवर उगाळून तयार केले जाते. खंडोबा देवासाठी केशर, सुगंधी दवणा व अत्तर मिश्रित चंदन श्रीक्षेत्र आळंदी येथील ह.भ.प. बल्लाळेश्वर महाराज वाघमारे यांच्या माध्यमातून आणण्यात येणार आहे. चैत्र महिन्यात पंढरपूर, आळंदी, देहू, जेजुरी आदी तीर्थक्षेत्रांमध्ये तसेच शहरी व ग्रामीण भागातील ग्रामदैवतांच्या मंदिरांमध्ये गुढीपाडवा, रामनवमी, चैत्र पौर्णिमा, अक्षयतृतीया व वैशाख पौर्णिमा या शुभदिवशी चंदनउटी सोहळे मोठ्या भक्तिभावाने साजरे केले जातात. या दोन महिन्यांच्या कालावधीत सुगंधी चंदन नेण्यासाठी विविध देवस्थानांचे ग्रामस्थ, सेवेकरी व भाविक श्रीक्षेत्र आळंदी येथे येत असतात, अशी माहिती ह.भ.प. वाघमारे यांनी दिली.सरत्या फाल्गुन आणि उगवत्या चैत्र महिन्यात वसंत–ग्रीष्म ऋतूच्या उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी गुढीपाडव्याच्या शुभदिनी धामणीच्या खंडोबा मंदिरात पहाटे स्वयंभू सप्तशिवलिंगाची वसंत पूजा, अभिषेक व आरती करण्यात येईल. त्यानंतर शाही वासंतिक चंदनउटी लेपन करून ऋतूनुसार फळांचा व पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात येणार आहे. पुढे उटीभजन होणार असून मंदिराच्या गाभाऱ्यात सुवासिक फुलांची आकर्षक सजावट करण्यात येणार आहे. मराठी नववर्षाच्या निमित्ताने हा पहिला भक्तिमय सोहळा उत्साहात साजरा केला जाणार आहे. या गुढीपाडव्याच्या चंदनउटी सोहळ्यास सर्व भाविकांनी आवर्जून उपस्थित राहून या पर्वणीचा लाभ घ्यावा, अशी विनंती ग्रामस्थ व सेवेकरी यांनी केली आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने धामणी येथील श्री खंडोबा मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी देवदर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. नगर, पुणे, नाशिक, मुंबई तसेच चिंचवड व भोसरी परिसरातून अनेक भाविक खंडोबाच्या दर्शनासाठी येथे येतात. धामणीच्या खंडोबा देवस्थानात गुढीपाडवा, चैत्र पौर्णिमा, अक्षयतृतीया व वैशाख पौर्णिमा या चार दिवशी स्वयंभू सप्तशिवलिंगाला चंदनउटी लेपन करण्यात येणार असल्याची माहिती सेवेकऱ्यांनी दिली.

## रागातून स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यावर सत्तूरने हल्ला; तिघांना अटक

पुणे (दै. संध्या)

मित्राच्या नातेवाइकाच्या अंत्यसंस्कारासाठी मोफत गोवऱ्या व लाकडे दिल्याच्या रागातून स्मशानभूमीतील टेंडरधारक व्यावसायिकाने विद्युत स्मशानभूमीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर सत्तूरने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना पाषाण येथे घडली. या प्रकरणी बाणेर पोलिसांनी तिघांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. याबाबत सचिन उत्तम रणपिसे (वय ३५, रा. सुतारवाडी, पाषाण) यांनी बाणेर पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यानुसार अजय अशोक माकर (वय २५), अतिश मारुती चव्हाण (२७) आणि रामू नर्सराज मुप्पाला (३२) यांना अटक करण्यात आली आहे. ही घटना ११ मार्च रोजी रात्री सुमारे पावणे बाराच्या सुमारास पाषाण येथील शिवशक्ती चौकाजवळ बालन सुतार यांच्या कार्यालयासमोर घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन रणपिसे हे औंध स्मशानभूमीत स्मशान ऑपरेटर म्हणून काम करतात. अजय माकर याला सुतारवाडी स्मशानभूमीत गोवऱ्या व लाकडे पुरवण्याचे टेंडर मिळाले आहे. दरम्यान, रणपिसे यांचा मित्र रोहित आडुळकर यांच्या चुलत्यांचे निधन झाले होते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने रणपिसे यांनी अंत्यविधीसाठी लागणाऱ्या गाईच्या शेणाच्या गोवऱ्या व लाकडे मोफत दिली होती. याचा राग मनात धरून अजय माकर याने ११ मार्च रोजी रात्री रणपिसे यांना विठ्ठल मंदिराजवळ बोलावले. तेथे माकरने "तू लाकडे व गोवऱ्या फुकट का दिल्या?" असा जाब विचारत शिवीगाळ केली. वाद वाढल्यानंतर त्याच्या साथीदारांनी रणपिसे यांना गाडीतून खाली ओढून मारहाण केली. त्यानंतर माकरने सत्तूरने त्यांच्या दोन्ही खांद्यांवर वार केले, तर तिसऱ्या आरोपीने त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर टाकली.

# न्हावा शेवा बंदरावर रो-रो सेवा सुरू करा : खासदार श्रीरंग बारणे

मावळ (दै. संध्या)

मावळ लोकसभा मतदारसंघातील न्हावा शेवा बंदरावर रोल-ऑन/रोल-ऑफ (रो-रो) सुविधा सुरू करण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय जलमार्ग मंत्री सर्वाणंद सोनोवाल यांची भेट घेऊन केली. ही सेवा सुरू केल्यास वाहतूक कोंडी कमी होईल, रोजगार वाढेल आणि उद्योजकांनाही फायदा होईल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

खासदार बारणे यांनी सोनोवाल यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. याबाबतचे सविस्तर निवेदन दिले. खासदार बारणे म्हणाले, पिंपरी, चिंचवड, तळेगाव आणि चाकण हा औद्योगिक पट्टा आहे. देशातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाईल उत्पादन केंद्रांपैकी एक म्हणून हा औद्योगिक भाग ओळखला जातो. या औद्योगिक पट्ट्यात ११ हून अधिक प्रमुख ऑटोमोबाईल उत्पादन कारखाने आणि ४,००० हून अधिक सहायक युनिट्स आहेत. ज्यामुळे हा प्रदेश ऑटोमोबाईल निर्यातीसाठी महत्त्वाचा बनतो. या भागात बजाज ऑटो, टाटा मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा फोक्सवॅगन, मर्सिडीज-बेंझ, ह्युंदाई, जनरल मोटर्स फोर्स मोटर्स, पियाजिओ, हिरो मोटोकॉर्प हे ऑटोमोबाईल उत्पादक आहेत.

सध्या रो-रो केवळ दक्षिण मुंबईतील मुंबई बंदर प्राधिकरण (माझगाव/कुलाबा परिसर) येथे उपलब्ध आहेत. दिवसा मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी आणि प्रवेशबंदीमुळे या भागात गंभीर परिणाम होतात. यामुळे केवळ लॉजिस्टिक विलंब होत नाही तर निर्यातदारांच्या वाहतूक खर्चातही लक्षणीय वाढ होते. औद्योगिक दृष्टिकोनातून मुंबई बंदर प्राधिकरण (माझगाव) - तळेगाव एमआयडीसीपासून सुमारे १४० किमी, जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) (न्हावा शेवा/जेएनपीटी) - तळेगाव एमआयडीसीपासून सुमारे ११० किमी अंतर आहे. न्हावा शेवा बंदर औद्योगिक क्षेत्राच्या जवळ आहे. तेथे चांगले महामार्ग कनेक्टिव्हिटी देखील आहे. यामुळे ऑटोमोबाईल वाहतुकीसाठी अधिक योग्य आणि व्यावहारिक पर्याय बनते.

न्हावा शेवा येथे पुरेशी जागा उपलब्ध आहे. त्याचा वापर रो-रो सेवेसाठी सुरू करता येईल. या सुविधेमुळे ऑटोमोबाईल उत्पादकांसाठी निर्यात लॉजिस्टिक्स सुलभ होईल. नवीन रोजगाराच्या संधीही निर्माण होतील. हा उपक्रम सरकारच्या मेक इन इंडिया आणि व्यवसाय सुलभतेच्या दृष्टिकोनाशी देखील सुसंगत असेल. या विषयावर जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या अध्यक्षांशी नुकतीच माझी चर्चा झाली आहे. त्यांनी बीएमसीटी टर्मिनलवर ही सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती करणारे औपचारिक पाठवले आहे. त्यामुळे न्हावा शेवा बंदरावर रो-रो सेवा सुरू करावी. या महत्त्वाच्या पायरीमुळे ऑटोमोबाईल उद्योगाला फायदा होईल, प्रादेशिक विकासाला गती मिळेल आणि जागतिक स्तरावर भारताची निर्यात स्पर्धात्मकता बळकट होईल, असे खासदार बारणे म्हणाले.

